दैनिक
राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–२२९ | सोमवार दि.०९ नोव्हेंबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

झाडे जगविण्यासाठी विंधन विहिरींच्या बंदीला १५ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ!

दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना मोठा दिलासा; आवश्यक तेथेच परवानगी–मुख्यमंत्री

नागपूर । प्रतिनिधी

राज्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता शेतातील झाडे जगविण्यासाठी विंधन विहिरी (बोअरवेल) घेण्यावरील बंदी येत्या १५ डिसेंबरपर्यंत शिथिल करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. विशेष बाब म्हणून ज्या ठिकाणी झाडे जगविण्यासाठी पाण्याची नितांत आवश्यकता आहे, अशाच ठिकाणी शेतीकामासाठी विंधन विहिरी घेण्यास परवानगी दिली जाणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. त्यामुळे दुष्काळी परिस्थितीत फळबागा आणि शेतातील झाडे वाचविण्यासाठी धडपडणाऱ्या शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळणार आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले की, राज्यातील भूजल पातळी आणि उपलब्ध पाणीसाठ्याचा विचार करता विंधन विहिरींचे खोलीकरण करणे किंवा नव्याने विंधन विहिरी खोदण्यावरील बंदी उठविणे हा सरकारसाठी अडचणीचा निर्णय आहे. मात्र, सध्याची दुष्काळी परिस्थिती आणि झाडे वाचविण्याची गरज



लक्षात घेऊन विशेष बाब म्हणून १५ डिसेंबरपर्यंत ही सवलत देण्यात येत आहे. या निर्णयाचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना संबंधित यंत्रणेकडून पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहणार आहे. ही परवानगी सरसकट दिली जाणार नसून ज्या ठिकाणी झाडे जगविण्यासाठी विंधन विहिरीची आवश्यकता आहे, अशाच ठिकाणी परिस्थितीचा विचार करून परवानगी देण्यात येईल. दुष्काळाच्या काळात पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा असल्याने नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा. उपलब्ध पाण्याची बचत करण्याबरोबरच पावसाचे पाणी जमिनीत ◀◀ पान २ वर

आता वैचारिक नक्षलवाद्यांशी मुकाबला–पंतप्रधान मोदी

बस्तर । वृतसंस्था

दरवर्षीप्रमाणे यंदाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दे शा च या रक्षणकर्त्यांसोबत दिवाळी साजरी केली. यावेळी पंतप्रधान मोदी छत्तीसगडमधील बस्तर येथे सीआरपीएफच्या जवानांसोबत दिवाळी साजरी करण्यासाठी पो हो चले. ए के का ळी नक्षलवाद्यांचा प्रभाव असलेल्या या भागात त्यांनी जवानांना



संबोधित केले. यावेळी त्यांनी विरोधकांवरही निशाणा साधला. काही संघटनांवर वैचारिक नक्षलवाद्यांनी कब्जा केला असून ते देशाच्या संविधान अ ा ण लोकशाहीविरोधात लोकांना भडकवत असल्याचे मोदी म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, ही पहिली दिवाळी आहे, जेव्हा देशातील प्रत्येक जिल्हा नक्षलवादमुक्त ◀◀ पान २ वर

ईडीने कायद्याच्या चौकटीत राहूनच काम केलं–हायकोर्ट



नवीदिल्ली । वृतसंस्था

अं म ल ब जा व णी संचालनालय हे 'सुपर कॉप' नाही, जे त्यांच्या निदर्शनास आलेल्या प्रत्येक गोष्टीचा तपास सुरू करू शकेल. या संस्थेने फटाकलं आहे. चौकटीत राहूनच काम केले पाहिजे, अशा शब्दात कर्नाटक हायकोर्टानं फटकारलं आहे. काँग्रेस नेते के. वाय. नांजे गौडा यांच्याशी संबंधित मनी लॉंड्रिंग प्रकरणात ईडीची कारवाई रद्द करताना न्यायालयाने हे निरीक्षण नोंदवले.

ईडी गौडा यांचा जमीन वाटप घोटाळ्याप्रकरणी तपास करत होती. मूळ जमीन घोटाळ्याचे ◀◀ पान २ वर

आणीबाणी ही मोठी चूक होती

● सोनिया गांधींचा खळबळजनक खुलासा

नवी दिल्ली । वृतसंस्था

माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात लादलेली आणीबाणी हा भारतीय राजकारणातील आणि काँग्रेसच्या इतिहासातील सर्वात वादग्रस्त टप्पा मानला जातो. याच आणीबाणीच्या निर्णयावरून गांधी कुटुंबात अंतर्गत मतभेद आणि प्रचंड वाद निर्माण झाला होता, असा धक्कादायक खुलासा काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्या सोनिया गांधी यांनी केला आहे.

आपल्या आत्मचरित्राच्या प्रकाशनापूर्वी दिलेल्या मुलाखतीत सोनिया गांधी यांनी आणीबाणी लादण्याचा निर्णय ही एक मोठी चूक होती अशी कबुली दिली. तसेच, जर संजय गांधी यांच्यावर योग्य वेळी नियंत्रण ठेवले असते तर आणीबाणीमुळे झालेलं मोठं नुकसान टाळता आलं असतं, असंही त्यांनी आवर्जून नमूद केलं.सन १९७५ ते १९७७ या काळात सुमारे दोन वर्षांसाठी लादल्या गेलेल्या आणीबाणीच्या निर्णयामुळे गांधी कुटुंबात दोन गट पडले होते. इंदिरा गांधी या मूळच्या लो क शा ही वादी विचारसरणीच्या होत्या आणि आणीबाणीचा निर्णय लागू करताना त्या स्वतः मानसिक दबावाखाली होत्या, असं सोनिया गांधी यांनी सांगितलं. एका कौटुंबिक जेवणाच्या दरम्यान संजय ◀◀ पान २ वर











अग्रलेख

दलालीवर चालणारे परराष्ट्र धोरण!

जागतिक राजकारणाच्या पटावर भारत आपल्या 'असीम आणि स्वयंभू' मुत्सद्देगिरीचा डंका पिटत असताना, वॉशिंग्टनच्या प्रशासकीय गल्लीबोळातून एक असा दस्तऐवज बाहेर आला आहे, ज्याने या आभासी जागतिक प्रभावाचे वस्त्रहरण केले आहे. अमेरिकेच्या 'फॉरेन एजंट्स रजिस्ट्रेशन ॲक्ट' च्या डिस्क्लोजर फायलिंगने आपल्या परराष्ट्र व्यवहारातील एक अत्यंत लाजीरवाणे चित्र जगासमोर आणले आहे. वॉशिंग्टनस्थित भारतीय दूतावासाने अमेरिकन लॉबिंग फर्म ' ' ला भारत-अमेरिका संबंध सुधारण्यासाठी नियुक्त केले होते. या फर्मचे मालक कोण? तर ट्रम्प यांच्या विश्वासातले जॅसन मिलर! आणि या कराराची अधिकृत किंमत काय होती? दरमहा १,५०,००० डॉलर्स! म्हणजेच भारतीय करदात्यांच्या खिशातून दरमहा तब्बल १ कोटी २५ लाख रुपयांपेक्षा जास्त रक्कमेची उधळपट्टी!

आता जरा या पैशाच्या मोबदल्यात मिळालेल्या कामाचे गणित मांडूया. हा करार एप्रिल २०२५ मध्ये सुरू झाला आणि एप्रिल २०२६ मध्ये त्याचे अत्यंत उत्साहाने नूतनीकरणही करण्यात आले. अखेर २३ जून २०२६ रोजी जॅसन मिलर हे स्वतः अमेरिकन सरकारमध्ये 'स्पेशल गव्हर्नमेंट एम्प्लॉई' बनले आणि हा कंत्राटी खेळ थांबला. पण या संपूर्ण कार्यकाळात, विशेषतः मे आणि जून २०२६ या दोन महिन्यांत, या सव्वा कोटी रुपये महिना लाटणाऱ्या फर्मने भारतासाठी नक्की कोणता डोंगर उपसला? च्या कागदपत्रांनुसार, या फर्मने व्हाइट हाऊसच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी भारताच्या बाजूने केवळ ८ फोन कॉल्स आयोजित केले! होय, अगदी अचूक वाचलेतफक्त आठ फोन कॉल्स! यात अमेरिकेचे ट्रेझरी सेक्रेटरी स्कॉट बेझंट आणि युनायटेड स्टेट्स ट्रेड रिप्रेझेंटेटिव्ह जेमिसन ग्रीर यांच्याशी झालेल्या संवादाचा समावेश होता. जर तुम्ही एका फोन कॉलची किंमत काढायला बसलात, तर लक्षात येईल की अमेरिकन अधिकाऱ्याचा 'हॅलो' ऐकण्यासाठी भारतीय करदात्यांनी कोट्यवधी रुपये मोजले आहेत. याला 'स्ट्रॅटेजिक मुत्सद्देगिरी' म्हणायचे की जनतेच्या पैशांवर घातलेला अधिकृत दरोडा? नाटकाचा अंक इथेच संपत नाही. लॉबिंगच्या या बाजारात ' ' नावाची दुसरी फर्मही तैनात होती, ज्यांना वेगळे ७५,००० ३डॉलर्स प्रति महिना (सुमारे ६२ लाख रुपये) मोजले जात होते. या फर्मच्या फायलिंगमधील सत्य तर अधिकच हास्यास्पद आहे. ट्रम्प यांनी त्यांच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पंतप्रधान नरेंद्र मोदींचे अभिनंदन करणारी जी पोस्ट टाकली होती, ती पोस्ट 'प्रसारित' करण्याचे काम या फर्मने आपल्या खात्यावर दाखवले आहे! आपले परराष्ट्र मंत्रालय आता अत्यंत केविलवाणा बचाव करत स्पष्टीकरण देत आहे की, ''फर्मने केवळ ती पोस्ट री-पोस्ट केली, विकत घेतली नाही.'' पण मूळ प्रश्न हा आहे की, अमेरिकन राष्ट्राध्यक्षांच्या एका सोशल मीडिया पोस्टची री-पोस्ट फिरवण्यासाठी आणि पीआर सांभाळण्यासाठी ६२ लाख रुपये महिना मोजण्याची नौबत का आली? आपल्या दूतावासातील प्रशासकीय अधिकाऱ्यांचे इंटरनेट कनेक्शन कापले होते की काय? भारताचे परराष्ट्र धोरण हे जगातील सर्वात चतुर आणि अनुभवी मुत्सद्यांद्वारे चालवले जाते, असा ढोल रात्रंदिवस वाजवला जातो. मग असे असताना वॉशिंग्टनच्या वर्तुळात थेट प्रवेश मिळवण्यासाठी आणि अवघे आठ फोन कॉल्स जोडण्यासाठी परदेशी एजन्सींना कोट्यवधी रुपयांची कंत्राटे का बाटावी लागतात? या ८ फोन कॉल्समधून भारताला नेमकी काय ठोस फलनिष्पत्ती मिळाली, याचा एक शब्दही अहवालात नाही. म्हणजेच, देशाच्या पदरात काही पडो अथवा न पडो, दलालांचे कमिशन मात्र वेळेवर पोहोचले पाहिजे! २३ जून रोजी मिलर सरकारमध्ये सामील झाले आणि हा कंत्राटी अध्याय बंद झाला. जोपर्यंत तुम्ही बाहेर आहात तोपर्यंत लॉबिंगच्या नावाखाली पैसे कमवा आणि आत गेल्यावर दुकान बंद कराहा कसला नैतिक व्यवहार? आपल्या देशात सामान्य नागरिक महागाई आणि कराच्या ओझ्याखाली भरडला जात असताना, वॉशिंग्टनच्या वातानुकूलित खोल्यांमध्ये काही फोन कॉल्ससाठी कोट्यवधी रुपयांची खैरात वाटली जात आहे. जर जागतिक संबंध केवळ अशा महागड्या दलालीवर आणि पीआर स्टंटवरच टिकून असतील, तर आपल्या परराष्ट्र धोरणाच्या 'विश्वगुरू' छापाच्या गप्पा मारणे आता तरी थांबवले पाहिजे. हा केवळ मुत्सद्देगिरीचा पराभव नाही, तर देशातील करदात्यांच्या विश्वासाचा झालेला थेट घात आहे.

माजलगावात भाजपच्या वतीने ५० कुटुंबांना फराळाचे वाटप करून'पालावरची दिवाळी' साजरी!



माजलगाव । प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस प्रदेशाध्यक्ष रवींद्रजी चव्हाण व लोकनेत्या पर्यावरण पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे साहेब व मा खासदार प्रीतमताई मुंडे साहेब यांच्या आव्हानाला प्रतिसाद देत एक दिवा वंचितांसाठी उपक्रमातून माजलगाव येथील पालावरील ५० कुटुंबांना माजलगाव भाजपाच्या वतीने दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. संपूर्ण महाराष्ट्र सध्या दुष्काळ असल्यामुळे सर्वसामान्य व्यक्ती सोबत दिवाळी साजरी करावी , दिवाळीचा सण सर्वांसाठी आनंदाचा ठरावा, या सामाजिक भावनेतून भारतीय जनता पार्टी माजलगावच्या वतीने 'एक दिवा वंचितांसाठी' हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत पालावर राहणाऱ्या संपूर्ण नागरिकांना दिवाळी फराळाचे वाटप करून त्यांच्यासोबत दिवाळीचा आनंद साजरा करण्यात आला.

लोकनेते पंकजाताई मुंडे व मा खासदार प्रीतमताई मुंडे यांनी सांगितले की समाजातील वंचित घटकांनाही सणाचा आनंद घेता यावा आणि त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलावे, या उद्देशाने माजलगाव भाजपाच्या वतीने हा उपक्रम आयोजित करून सामाजिक बांधिलकी जपत पालावरील नागरिकांसोबत दिवाळी साजरी करण्यात आली व भाजपच्या या उपक्रमातून सामाजिक एकोपा आणि माणुसकीचा संदेश देण्यात आला. या कार्यक्रमाच्या प्रसंगी माजलगाव भाजपाचे शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी कीट्टी आडगाव मंडळाच्या अध्यक्षा रूपालीताई कचरे पाथरूड मंडळ अध्यक्ष डॉ अभिजीत सोळंके भाजपा नेते मा सरपंच ज्ञानेश्वर सरवदे नानासाहेब घोडके माजलगाव शहर मंडळ उपाध्यक्ष बाळासाहेब क्षीरसागर रामेश्वर चव्हाण भाजपाचे कोषाध्यक्ष आनंद कुलकर्णी सचिव विनोद लड्डा बीड जिल्हा युवा मोर्चाचे उपाध्यक्ष शहाजी सोळंके , भाजपा युवा मोर्चाचे बीड जिल्हा सरचिटणीस विष्णू आगे माजलगाव भाजपा सोशल मीडियाचे अध्यक्ष राजेभाऊ लोखंडे युवा नेते शरद कचरे सुनील दळवे बाळासाहेब साळवे सुशांत जाधवर शरद पवार बाबुराव मुरकुटे नचिकेत रत्नपारखी यांच्यासह भाजप पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

४०० निराधारांच्या चेहऱ्यावर फुलविला दिवाळीचा आनंद; साई प्रेम फाऊंडेशनचा माणुसकीचा उपक्रम!

परळी वै । प्रतिनिधी

दिवाळी म्हणजे केवळ दिव्यांचा आणि रोषणाईचा सण नसून नाती जपण्याचा, माणुसकीचा आणि आनंद वाटण्याचा उत्सव आहे. याच भावनेतून सामाजिक बांधिलकी आणि माणुसकीची जाणीव जपत परळीतील सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या साई प्रेम फाऊंडेशनच्या वतीने ४०० निराधार, गोरगरीब व वंचित नागरिकांना दिवाळी फराळ किटचे वाटप करून त्यांची दिवाळी गोड करण्यात आली. दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून 'दुष्काळात माणुसकीचा आधार' देण्यात आला.



साई प्रेम फाऊंडेशनचे साईभक्त तथा उद्योजक रवींद्र (पापा) गित्ते आणि नगर परिषदेच्या पाणीपुरवठा सभापती सौ. जयश्रीताई गित्ते यांच्या पुढाकारातून दीपावली तथा लक्ष्मीपूजनाच्या दिवशी हा उपक्रम राबविण्यात आला. घाटनांदूर येथील गुरुदास सेवा आश्रम, परळीतील वैद्यनाथ मंदिर परिसर, रेल्वे स्टेशन परिसर तसेच वैद्यनाथ महाविद्यालय परिसरातील निराधार व गरजू नागरिकांपर्यंत फाऊंडेशनच्या वतीने त्यांना दिवाळी फराळ किटचे वाटप करून त्यांच्यासोबत आपुलकीने संवाद साधत दिवाळी साजरी करण्यात आली. दिवाळीचा आनंद प्रत्येकाच्या आयुष्यात पोहोचावा, अन्नापासून कुणीही वंचित राहू नये, या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. 'अन्नाविन वंचित कुणी न राहो, एवढा आशीर्वाद आम्हा तुम्ही द्याहो' या भावनेतून फाऊंडेशनने निराधारांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा प्रयत्न केला. साई प्रेम फाऊंडेशनच्या वतीने विविध समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबविले जात असून, सामाजिक संवेदनशीलता आणि सेवाभाव जपण्याचे काम केले जात आहे. दुष्काळासारख्या कठीण परिस्थितीत समाजातील गरजू घटकांच्या पाठीशी उभे राहणे हीच खरी सामाजिक बांधिलकी आहे. 'दुष्काळासारख्या आपत्तीत आम्ही सारे आपल्या सोबत आहोत,' हा विश्वास या उपक्रमातून निराधार व वंचित नागरिकांना देण्यात आला. दिवाळीच्या फराळासोबत मिळालेली आपुलकी, संवाद आणि मायेच्या सहवासामुळे लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आले. त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद हेच या उपक्रमाचे खरे यश ठरले. यावेळी भास्कर मामा चाटे, सुरेश टाक, टी.डी. मुंडे, मुंबई येथील अभियंता अमोल सोनवणे, भागवत मुंडे, जगु पवार, महेश मंत्री, राज (प्रेम) रवींद्र गित्ते, रुजूता (सई) रवींद्र गित्ते, पिटू दुदले, प्रसाद कुलकर्णी आदी उपस्थित होते.

पुण्यात उभारणार महाराष्ट्रातील सर्वांत मोठे बसस्थानक

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील शिवाजीनगर एसटी बसस्थानकाचा लवकरच कायापालट होणार आहे. तब्बल ८२५ कोटी रुपये खर्च करून या बसस्थानकाचा सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्त्वावर पुनर्विकास करण्यात येणार आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर शिवाजीनगर बसस्थानक महाराष्ट्रातील सर्वांत मोठे आणि आधुनिक वाहतूक केंद्र ठरण्याची शक्यता आहे. या प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ आणि महामेट्रो यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला.

मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात बुधवारी झालेल्या बैठकीत या करारावर स्वाक्ष-या करण्यात आल्या. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते.. यामध्ये प्रशस्त प्रतीक्षागृह, बस उभ्या करण्यासाठी मोठी जागा, बस दुरुस्तीसाठी स्वतंत्र कार्यशाळा आणि व्यावसायिक वापरासाठी जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे. याशिवाय प्रवाशांना आवश्यक असलेल्या इतर सुविधांचाही समावेश असेल. विशेष म्हणजे, या बसस्थानकातून वेगवेगळ्या सार्वजनिक वाहतूक सेवांना जोडण्याची योजना आहे. एसटी बस, पुणे मेट्रो, रेल्वे, पीएमपीएमएल बस आणि रिक्षा या सर्व सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध होतील. त्यामुळे प्रवाशांना एका वाहनातून दुस-या वाहनात जाणे अधिक सोपे होणार आहे.या प्रकल्पासाठी लवकरच निविदा प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता आहे. त्यानंतर प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात होईल. पुढील तीन ते चार वर्षांत हा प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. नव्या वाहतूक केंद्रातून दररोज एक लाखाहून अधिक प्रवासी प्रवास करतील, असा अंदाज आहे. पुण्यासह खानदेश, मराठवाडा, विदर्भ आणि मुंबईकडे जाणा-या प्रवाशांना याचा मोठा फायदा होणार आहे.

दिवाळीच्या पूर्वसंध्येला काळाचा घाला!

कार-मोटारसायकलच्या भीषण अपघातात पडोळे कुटुंबातील तिघांचा मृत्यू



आष्टी । प्रतिनिधी

दिवाळीच्या पूर्वसंध्येला आनंदाच्या क्षणांवर दुःखाचे सावट पसरवणारी हृदयद्रावक घटना घडली आहे. आष्टी तालुक्यातील केळसांगवी येथील पडोळे कुटुंबातील तिघांचा मिरजगावजवळील बाभळगाव येथे झालेल्या भीषण अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. सुदाम मारुती पडोळे (वय ५५), देविदास मारुती पडोळे (वय ५५) आणि श्रेया विशाल पडोळे (वय १०) अशी मृतांची नावे आहेत. या घटनेमुळे केळसांगवी गावासह संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

'आजोबा, मला दिवाळीला नवे कपडे घ्या ना...

नवे कपडे आणि फटाके मला पाहिजेत,'' नुकत्याच बापाचे छत्र हरवून बसलेल्या श्रेयाने हट्ट धरला होता.शेतातील कापूस विकून येणाऱ्या पैशांतून तिच्या हातावर नवे कपडे ठेवण्याचा आनंद आजोबांना मिळणार होता; मात्र नियतीला हे मान्य नव्हते. एका क्षणात या चिमुरडीचा जीव गेल्याने संपूर्ण पंचक्रोशी हळहळ व्यक्त करत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, केळसांगवी येथील पडोळे कुटुंबातील सदस्य कापूस विक्रीसाठी मिरजगावजवळील बाभळगाव येथील जिनिंगवर गेले होते. कापूस जिनिंगवर घालून सायंकाळी सुमारे सहा वाजण्याच्या दरम्यान ते मोटारसायकलवरून घरी परतत होते. याचवेळी मोटारसायकल आणि कार यांच्यात भीषण अपघात झाला. धडक एवढी जोरात होती की मोटरसायकल ला तब्बल ३०० फूट फरफटत नेले.या अपघातात तिघांना गंभीर दुखापत झाली. मात्र, या दुर्दैवी घटनेत तिघांचाही मृत्यू झाला. दिवाळीचा सण अवघ्या काही तासांवर येऊन ठेपला असताना पडोळे कुटुंबावर काळाने घाला घातला. सणासाठी घरी परतणाऱ्या कुटुंबीयांवर नियतीने असा आघात केल्याने गावकऱ्यांचेही मन सुन्न झाले आहे.घरात दिवाळीची तयारी आणि सणाचा उत्साह असण्याऐवजी आता दुःखाचा डोंगर कोसळला आहे. अपघातानंतर मृतदेहांचे शवविच्छेदन मिरजगाव येथे करण्यात आले.या घटनेची माहिती समजताच परिसरातून शोकसंवेदना व्यक्त करण्यात येत आहेत. आष्टी तालुक्यातील सुदाम मारुती पडोळे, देविदास मारुती पडोळे आणि श्रेया विशाल पडोळे यांच्या अपघाती निधनाची बातमी अत्यंत दुःखद व मन हेलावून टाकणारी आहे. सणासुदीच्या काळात पडोळे कुटुंबावर कोसळलेला हा दुःखाचा डोंगर मन सुन्न करणारा आहे, या भीषण अपघातप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, संबंधित पोलीस ठाण्याचे अधिकारी पुढील तपास करीत आहेत. दिवाळीच्या मंगलमय पर्वावर एका कुटुंबातील तिघांचा असा दुर्दैवी अंत झाल्याने केळसांगवी गावावर शोककळा पसरली आहे. आनंदाचा सण एका क्षणात दुःखात बदलल्याने संपूर्ण परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे.

॥ संत तुकोबांची दिवाळी.... ॥

दसरा दिवाळी तोचि आम्हां सन ॥
सखे संतजन भेटतील ॥१॥
आमुप जोडल्या पुण्याचिया राशी ॥
पार त्या सुखासी नाहि लेखा ॥२॥
धन्य दिवस आजी झाला सोनियाचा ॥
पिकली हे वाचा रामनामें ॥३॥
तुका म्हणे काय होऊं उतराई ॥
जीव ठेवू पांयीं संतांचिये ॥४॥
- संत तुकाराम महाराज

सखे संत जेंव्हा भेटतात तोच आमचा दसरा-दिवाळीचा सण ! आम्ही अमाप पुण्याच्या राशी कमावलं आहे त्यामुळे आमच्या सुखाला आता पारावर राहिला नाही. आजचा दिवस सोन्याचा झाला आहे त्यामुळे आम्ही धन्य झालो. राम (नामाने) वाचा परिपक्व झाली. संत तुकाराम महाराज म्हणतात, ''मी तुमचा कसा उतराई होऊ, मी माझे प्राण तुमच्या चरणीं अर्पण करत आहे.

दिवाळी-दसरा म्हटलं म्हणजे आनंदी आनंद ! सुगी झालेली असते. पाऊस थांबलेला असतो. रानात भरपूर चारा झालेला असतो. त्यामुळे जनावरं खाऊन पिऊन धष्टपुष्ट झालेली असतात. धान्यांच्या राशी घरात येऊन पडलेल्या असतात. त्यामुळे कुणबीही आनंदी असतो. बळीराजा सुखी तर जग सुखी ! त्यामुळे शेतमजूर अलुतेदार, बलुतेदारही खुष असतात. सर्व भूमी, डोंगरदऱ्या हिरव्या शालूने नटलेले असतात. ओढे-नाले भरुन वहात असतात. तळी भरलेली असतात. सर्व सृष्टी आनंदाने न्हाऊन निघालेली असते. दसरा सण मोठा । नाही आनंदा तोटा ॥ आणि दिवाळीचं महत्त्व तर आगळंच ! दिवाळी म्हटली की घरं आवरणार, नवा रंग देणार. भांडीकुंडी, डबेबाटल्या, आंथरुण-पांघरुण सर्व धुवून, पुसून लखलखीत कळणार! सासरी गेलेल्या लेकीबाळी माहेरी येणार ! कष्टकऱ्यांच्या जीवनात गोडधोड, साग्रसंगीत स्वयंपाकालाही निमित्त दिवाळीचंच ! दिवाळीचा फराळ म्हणजे बालगोपालांना मेजवानीच ! सासरी गेलेल्या लेकीला माहेरच्या मूळ कधी येणार याची आस लागते. धुणंभांडी, स्वयंपाकपाणी सगळं करत असताना तिची नजर परत परत रस्त्याकडे जात असते. तिला माहेरची ओढ लागलेली असते. तिचं बालपण, बालपणाच्या मैत्रिणी, तिचं घर, अंगण, गाव सारं तिच्या नजरेपुढे फेर धरुन नाचत असतात. मन आठवणींच्या हिंदोळ्यावर सतत डोलत असतं. त्या आठवणींनी तिच्या जीवाला हुरहुर लागलेली असते! सासुरवाशीणीच्या त्या मनःस्थितीचं दर्शन तुकाराम महाराज त्यांच्या एका अभंगातून फार मार्मिक शब्दात करतात. ''दिवाळीच्या मुळा लेकी आसावली । पाहतसे वाटुली पांडुरंगे ॥''. अशी ही दिवाळी साऱ्या सर्व नात्यांना उजाळा देते. आनंद देते. वर्षभराचं सर्व कष्ट, दुःख पचवायची ताकद देते. जगण्याची ऊर्जा देते. तुकाराम महाराजांना हा आनंद, हा उत्साह, ही ऊर्जा संतांच्या भेटीतून मिळते. म्हणून जगद्गुरू तुकाराम महाराज म्हणतात, ''दसरा दिवाळी तोचि आम्हां सण । सखे संतजन भेटतील ॥

जगतगुरु तुकाराम महाराजांनी हाच इतर अनेक अभंगांतूनही व्यक्त केला आहे. त्यातून तुकाराम महाराजांना संतांबद्दल असलेला अतिव आदर, जिव्हाळा, आपुलकी, आत्मियता, ओढ वारंवार व्यक्त झाली आहे. संतांना तुकाराम महाराज सखे म्हणजे जिवलग मित्र संबोधतात, मायबाप म्हणतात. सगेसोयरे म्हणतात. देव म्हणतात. त्यांच्या पायी लोटांगण घालतात. त्यांचं दास्यत्व स्विकारण्याची भाषा करतात. त्यांचं उष्टे अन्न भक्षण करुन त्यांच्या पायी राहण्याची इच्छा व्यक्त करतात. तुकाराम महाराजांचे हे सगेसोयरे म्हणजे संत नामदेव महाराज, संत ज्ञानदेव महाराज, संत जनाई, संत चोखोबा, संत सोयराई, संत कबीर, संत सजन कसाई, संत दादू पिंजारी, संत नरहरी सोनार, संत सेना, संत सावता अशी सारी संतांची मांदियाळी म्हणजे तुकाराम महाराजांचे सगेसोयरे आहेत. त्यांच्या सहवासाची तुकाराम महाराजांना आस आहे. ओढ आहे. त्यांच्या सहवासाने तुकाराम महाराजांना अतिव आनंद होतो. त्यांच्या सहवासात तुकाराम महाराजांच्या चित्तवृत्ती फुलून येतात. म्हणून ही सर्व मंडळी जेंव्हा घरी येतात तेंव्हा तो दिवस म्हणजे तुकाराम महाराजांना दसरा-दिवाळी इतका आनंदाचा आणि महत्त्वाचा सण वाटतो. तेराव्या शतकातले संत नामदेव, संत ज्ञानदेव, संत जनाई वगैरे सतराव्या शतकातल्या तुकाराम महाराजांच्या घरी कसे येणार ? असा प्रश्न एखाद्याला पडू शकतो. कितीही महान व्यक्ती असली तरी तिचं शरीर मर्त्यच असतं. आपली प्रजा दुःखी असलेली दिसली तर त्याला अतिव दुःख होईल. आपल्या प्राणप्रिय बळीराजाला दुःख होऊ नये म्हणून प्रजा आपलं दुःख त्याच्या नजरेस पडणार नाही, आपण आनंदी आहोत असं दर्शवण्यासाठी नटते थटते. नवे कपडे, दागदागिने, घरादाराला रंगरंगोटी करुन खायला गोडधोड अन्नपदार्थ करुन खूप आनंदी असल्याचं दाखवते. आपली प्रजा सुखासमाधानात असल्याचं पाहून, बळीराजा आनंदी होतो आणि समाधानाने पुन्हा पाताळी जातो अशी ही आख्यायिका आहे आख्यायिका हि ऐकीव नसते तर पहिल्या पिढीने पाहिलेले पुढच्या पिढ्यांना सांगणे याला आख्यायिका असे म्हणतात. आता असा प्रश्न आहे, आपल्या प्रजेच्या सुखाने सुखी होणाऱ्या आणि प्रजेचं दुःख पाहून दुःखी होणाऱ्या या थोर बळीराजाला विष्णुने वामनाचा अवतार घेऊन पाताळी का घातलं? जगतगुरू संत तुकाराम महाराजांनीही आपल्या एका अभंगातून, ''बळी सर्वस्वे उदार । ज्याने उभारीला कर ॥ त्याला करुनी कहार । पाताळी घातला ॥'' अशा स्पष्ट शब्दात या घटनेचा निषेध केला आहे. कहर म्हणजे टोकाचं नुकसान, भयंकर नुकसान, भयंकर जुलुम, अत्याचार ! तुकाराम महाराजांना पोथ्या-पुराणातून ज्या कथा सांगितल्या गेल्या त्यात दडलेल्या एका प्रदीर्घ सांस्कृतिक संघर्षाच्या इतिहासाची जाण होती. आपलं बळीराजा बरोबर असलेलं नातं त्यांना माहित होतं. पण आजच्या बहुसंख्य कीर्तनकारांना याचं ज्ञानही नाही आणि जाणिवही नाही. त्यांना आजच्या कीर्तन पाठशाळेत जेवढं शिकवलं तेवढंच ते पाठ करतात आणि पोपटासारखी त्याचीच री ओढत राहतात यामुळे ते श्रोत्यांचीही दिशाभूल करत राहतात. अशिक्षित देवभोळीळ्या जनतेला फसवतात. ही जाणिव होण्यासाठी पोथ्यापुराणं चिकित्सकपणे अभ्यासली गेली पाहिजेत. त्यातलं सार-असार समजून घेतलं पाहिजे. यावर अभ्यास संशोधन केलेल्या संशोधकांचं लिखाण वाचलं पाहिजे. त्यावर चिंतन केलं पाहिजे. पोथ्यापुराणं ब्राह्मणांनी लिहून ठेवल्या. त्या लिहितांना त्यांचे उद्देश समाजावर स्वतःचं महत्त्व ठसवायचं, सर्वांच्या मनावर आपलं प्रभुत्त्व ठसवायचं असेच होते. त्यामुळे त्यांनी जे मांडलं ते जसंच्या तसं स्विकारणं हाच मुळात अज्ञानीपणा आहे. जगतगुरु संत तुकाराम महाराजांनी सांगितल्याप्रमाणे, 'सत्य असत्यासी मन ग्वाही' करुन योग्य, अयोग्य आपण स्वतः ठरवलं पाहिजे..! राहुल सांकृत्यायनांपासून, सत्यशोधक भाई माधवराव बागल, प्राच्यविद्यापंडित कॉम्रेड प्रा. शरद पाटील, डॉ. आ. ह. साळुंखे यांसारख्या अभ्यासकांनी, विचारवंतांनी, प्रकांडपंडितांनी जे संशोधन करुन सत्य मांडलं आहे ते समजून घेतलं पाहिजे. आपल्या रुढी समजुती पेक्षा वेगळं काही असलं की लगेच त्यावर काहीतरी शिक्का मारुन पाठ फिरवणं ही संत तुकाराम महाराजांची शिकवण नाही. आपण तुकाराम महाराजांचे वारस आहोत. प्रस्थापित, जुलुमी समाज व्यवस्थेविरोधात बंड करणाऱ्या संतशिरोमणी नामदेव महाराज, धार्मिक ज्ञान फक्त संस्कृतमध्येच हा दंडक मोडून गीतेचं प्राकृत भाषेत भाषांतर करणाऱ्या बंडखोर संत ज्ञानदेवांचे आपण वारस आहोत. ''वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा । येरांनी वाहावा भार माथा ॥'' असं म्हणून धर्मशास्त्रावरची ब्राह्मणांची मक्तेदारी मोडून काढणाऱ्या आणि आपल्या बुद्धीने विचार करुन, ''वेदा वीर्यशक्ती नाही''; या निकषावर येणाऱ्या जगतगुरु संत तुकाराम महाराजांचे आपण वारस आहोत. वारकरी कोणावरही अंधविश्वास ठेवत नाहीत. आपल्या संतांनीच आपल्याला बंड करायला शिकवलं आहे. प्रश्न विचारायला शिकवलं आहे. आपल्या बुद्धीने विचार करायला शिकवलं आहे. संतांची ही शिकवण ध्यानी धरुन आपण दिवाळी साजरी करु या ! फटाके मुक्त दिवाळी, प्रदुषणमुक्त दिवाळी, आपल्या आनंदात इतरांना सहभागी करुन घेणारी दिवाळी, इतरांचं दुःख हलकं करणारी दिवाळी साजरी करु या..! आपल्या सर्वांच्या मनात, सद्विचाराचे, संतविचाराचे, सत्याचे लक्ष लक्ष दीप उजळोत हीच संत तुकाराम महाराज व गाथा अभ्यासक परिवाराच्या वतीने आपणा सर्वांना दिवाळीच्या मनःपुर्वक शुभेच्छा !

भाई आकाश निर्मळ
● मो.९४२२५३६९००

पान १ वरून...

झाडे जगविण्यासाठी विंधन विहिरींच्या

मुरविण्यासाठी पुनर्भरणाची कामे करावीत, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले. भूजलसाठ्यावर वाढता ताण निर्माण होत असताना केवळ नवीन जलस्रोत निर्माण करण्याऐवजी उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन आणि जलसंधारणावरही भर देण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. दरम्यान, राज्यातील अनेक भागांत वन्यप्राण्यांकडून शेतीपिकांचे नुकसान होत असल्याचा प्रश्नही मुख्यमंत्र्यांनी उपस्थित केला. जंगलालगत असलेल्या शेतांमध्ये वन्यप्राणी शिरून पिकांचे नुकसान करतात. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका सहन करावा लागतो. या समस्येवर उपाय म्हणून शासनाची तार कुंपण योजना अधिक व्यापक करण्यात येणार आहे. विशेषतः जंगलाला लागून असलेल्या शेतांना या योजनेत प्राधान्य दिले जाणार असून, वन्यप्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक उपाययोजना केल्या जातील, असे त्यांनी सांगितले. दुसरीकडे, दुष्काळी परिस्थितीत उपलब्ध जलसाठ्यांची क्षमता वाढविण्यासाठी जलसाठ्यांमधील गाळ काढण्याची कामेही हाती घेण्यात आली आहेत. तलाव आणि अन्य जलसाठ्यांमधील गाळ काढून तो शेतजमिनीत टाकण्याच्या कामांना प्रोत्साहन दिले जात आहे. यामुळे एकीकडे जलसाठ्यांची पाणी साठविण्याची क्षमता वाढण्यास मदत होईल, तर दुसरीकडे गाळामुळे शेतजमिनीची सुपीकता वाढण्यास हातभार लागू शकतो. एकंदरीत, दुष्काळी परिस्थितीत शेतातील झाडे वाचविण्यासाठी विंधन विहिरींबाबत मर्यादित सवलत, वन्यप्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी व्यापक तार कुंपण योजना आणि जलसाठ्यांतील गाळ काढण्याची कामे अशा विविध उपाययोजनांद्वारे शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या घोषणेतून स्पष्ट झाले आहे. मात्र, विंधन विहिरींसाठी परवानगी देताना कोणते निकष लावले जाणार आणि प्रत्यक्षात किती शेतकऱ्यांना या सवलतीचा लाभ मिळणार, याकडे आता शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

आता वैचारिक नक्षलवाद्यांशी

झाला आहे आणि आपण जवानांसोबत दिवाळी साजरी करत आहोत. याचे संपूर्ण श्रेय जवानांच्या बलिदानाला आणि समर्पणाला जाते, असेही त्यांनी सांगितले. क्षलवादाविरोधातील लढाईत सुरक्षादलांनी दिलेल्या बलिदानाचा सन्मान करण्यासाठी आपण त्यांच्यासोबत दिवाळी साजरी करत असल्याचे मोदी म्हणाले. मोदी पुढे म्हणाले, आमच्या सरकारने नक्षलवादी आणि फुटीरतावाद्यांच्या आर्थिक रसद पुरवठ्यावर मोठा प्रहार करणारे निर्णय घेतले. सरकारच्या निर्णयांमुळे बनावट नोटांचे जाळे उद्ध्वस्त झाले आणि नक्षलवादी तसेच फुटीरतावाद्यांची पुरवठा साखळी विस्कळीत झाली. गेल्या ४७ वर्षांत पहिल्यांदाच, मागील एका वर्षात कर्तव्य बजावताना सीआरपीएफच्या एकाही जवानाला प्राण गमवावे लागले नाहीत.नक्षलवादाविरोधातील लढाई सोपी नव्हती, असेही पंतप्रधानांनी सांगितले. एकेकाळी देशातील जवळपास २० राज्यांमधील २३० हून अधिक जिल्हे नक्षलवादाच्या विळख्यात होते. संध्याकाळ झाली की जनजीवन ठप्प व्हायचे. लोकांना घराबाहेर पडणेही अशक्य व्हायचे. नागरिकांचा मतदानाचा अधिकारही नक्षलवाद्यांनी हिरावून घेतला होता. बिहार, महाराष्ट्र, ओडिशा, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि छत्तीसगडसह देशाचा मोठा भाग डाव्या विचारसरणीच्या उग्रवादाच्या प्रभावाखाली होता. हजारो गावे आणि कोट्यवधी लोकांना वर्षभरात दोन ते तीन हजार नक्षली हल्ल्यांचा सामना करावा लागत होता.

आणीबाणी ही मोठी

गांधी यांनी इंदिरा गांधी यांच्यावर आणीबाणी लादण्यासाठी शेवटचा आणि मोठा दबाव टाकला होता. 'विरोधी पक्षांना आता रोखायलाच हवे,' असे संजय गांधी म्हणाले होते. यावर राजीव गांधी यांनी आपल्या आईला आणीबाणी ऐवजी आगामी निवडणुकांची वाट पाहण्याचा सल्ला दिला होता. मात्र, संजय गांधी यांच्या हट्टापुढे आणि त्यांच्या प्रभावापुढे राजीव गांधी यांचे ऐकले गेले नाही, असं सोनिया गांधी यांनी म्हटलं.त्या काळात इंदिरा गांधी यांच्याभोवती राजीव गांधींसारखे मोजकेच लोक होते ज्यांचे मत आणीबाणीच्या विरोधात होते. संजय गांधींकडे कोणतेही घटनात्मक पद किंवा मंत्रिमंडळाचे पद नसतानाही त्यांनी या काळात अफाट सत्ता गाजवली. जबरदस्तीने केलेली नसबंदी आणि दिल्लीतील झोपड्यांवर चालवलेला बुलडोझर यांसारख्या अतिरेकी निर्णयांमागे संजय गांधींचाच हात होता, असा दावा सोनिया गांधी यांनी केला.

ईडीने कायद्याच्या चौकटीत

प्रकरण रद्द झाल्यानंतरही, ईडीने संबंधित व्यक्तींना समन्स बजावून आपला तपास सुरू ठेवला होता. या कारवाईला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. न्यायमूर्ती एम. आय. अरुण यांनी म्हटले आहे की, कायदा आणि सुव्यवस्था राखणे ही राज्याची जबाबदारी आहे, केंद्र सरकारची नाही.के. वाय. नांजे गौडा हे मालूर येथील भू-अनुदान समितीचे अध्यक्ष होते. आरोप असा होता की, त्यांनी आणि समितीच्या इतर सदस्यांनी आपल्या पदांचा गैरवापर करून सुमारे ८० एकर सरकारी जमीन ३८ व्यक्तींना बेकायदेशीरपणे वाटप केली. ईडीने या प्रकरणात मनी लाँडरिंगचा तपास सुरू केला.जानेवारी २०२४ मध्ये, ईडीने १४ ठिकाणी छापे टाकले. एजन्सीच्या म्हणण्यानुसार, २५ लाखांपेक्षा जास्त रुपये रोख रक्कम आणि ५० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या जंगम आणि स्थावर मालमत्तेशी संबंधित कागदपत्रे जप्त करण्यात आली.भरतीशी संबंधित आरोपांची चौकशी करण्यासाठी ईडीने विशेष न्यायालयात एक खासगी तक्रारही दाखल केली. एजन्सीने असा युक्तिवाद केला की, तांत्रिक कारणांमुळे मूळ प्रकरण बंद करण्यात आल्यामुळे, त्यासंबंधित मनी लाँडरिंगच्या आरोपांची चौकशी सुरू ठेवता येऊ शकते. दुसरीकडे, आरोपींनी उच्च न्यायालयात असा युक्तिवाद केला की, नवीन मूळ गुन्हा निर्माण करून तपास सुरू करण्याचा अधिकार ईडीला नाही.

दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार दि. ०९ नोव्हेंबर २०२६
३

थोडक्यात

देवळा येथील संस्कृती कदम हिची नासा–इस्रो शैक्षणिक सहलीसाठी निवड

वडवणी :–ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थी आपल्या बुद्धिमत्तेच्या आणि जिद्दीच्या जोरावर मोठी भरारी घेऊच शकतात, देवळा येथील संस्कृती कदम ह्या विद्यार्थिनीने सिद्ध करून दाखवले आहे.

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा देवळा येथील इयत्ता सातवीची विद्यार्थिनी कु. संस्कृती सुनील कदम हिची यंदाच्या प्रतिष्ठित नासा व इस्रो शैक्षणिक सहलीसाठी निवड झाली आहे.



या यशामुळे संपूर्ण वडवणी तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. संस्कृती कदम हिने आपल्या गुणवत्तेची चमक दाखवत सर्वप्रथम केंद्रस्तरीय परीक्षा यशस्वीरीत्या पार केली. त्यानंतर तालुकास्तरावरील परीक्षेतही उल्लेखनीय कामगिरी केली आणि आता जिल्हास्तरावरील परीक्षेत दैदीप्यमान यश संपादन करत नासा व इस्रो या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या अंतराळ संशोधन संस्थांच्या शैक्षणिक सहलीसाठी आपले स्थान निश्चित केले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ही निवड म्हणजे प्रेरणादायी आणि कौतुकास्पद कामगिरी ठरली आहे. या यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत, जिद्द, अभ्यासातील सातत्य आणि शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन यांचा मोठा वाटा आहे. जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा देवळा येथील मुख्याध्यापक पांढरे सर, मार्गदर्शक निलेश चव्हाण सर, वर्गशिक्षक नाटकर सर, वरकड सर, सावंत सर, पिसाळ सर, साबळे मॅडम यांनी विद्यार्थिनी साठी यशासाठी विशेष परिश्रम घेतले.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल वडवणी तालुक्याचे कर्तव्यदक्ष गटविकास अधिकारी अशोक बाराखोते, कार्यतत्पर गटशिक्षणाधिकारी राहुल भट्टी यांच्यासह सर्व केंद्रप्रमुख, केंद्रीय मुख्याध्यापक आणि शिक्षकवृंद यांनी संस्कृतीचे विशेष अभिनंदन केले असून तिच्या पुढील शैक्षणिक सहलीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

जिल्हा परिषद शाळा देवळा येथे शिक्षण घेणाऱ्या या विद्यार्थिनीने आपल्या कर्तृत्वातून ग्रामीण भागातील शैक्षणिक गुणवत्तेचा ठसा उमटवला आहे.थेट सातासमुद्रापार असलेल्या अमेरिकेच्या नासा आणि भारतातील श्रीहरीकोटा येथील इस्रोसारख्या जागतिक स्तरावरील अंतराळ संशोधन संस्थांना भेट देण्याची संधी मिळणे ही त्यांच्या आयुष्यातील एक अविस्मरणीय पर्वणी ठरणार आहे.या सहलीतून तिला विज्ञान, तंत्रज्ञान, अंतराळ संशोधन आणि नव्या वैज्ञानिक संकल्पना प्रत्यक्ष अनुभवण्याची संधी मिळणार आहे.विद्यार्थ्यांच्या या यशामुळे देवळा गावासह संपूर्ण वडवणी तालुक्याची मान उंचावली असून, त्यांच्या या यशाने इतर विद्यार्थ्यांनाही मोठी स्वप्ने पाहण्याची आणि ती पूर्ण करण्यासाठी जिद्दीने प्रयत्न करण्याची प्रेरणा मिळाली आहे.या गुणवंत विद्यार्थिनीचे त्यांचे पालक, मार्गदर्शक शिक्षक आणि संबंधित शाळांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

ना. पंकजाताई मुंडेंची यंदाची भाऊबीज ऊसतोड कामगार व शेतकऱ्यांसोबत

दुष्काळ, ऊसतोड कामगारांचे दुःख आणि तरुण ऊसतोड कामगाराच्या अपघाती मृत्यूने मन हेलावले

बीड । प्रतिनिधी

सध्याची दुष्काळी परिस्थिती ऊसतोड कामगारांचे दुःख आणि ऐन दिवाळीत सकाळी सकाळी मतदारसंघातील ऊसतोड तरुणाच्या अपघाती मृत्यूची आलेली बातमी ऐकून आपण व्यथित झालो. यंदाची भाऊबीज ऊसतोड कामगार आणि शेतकऱ्यांसोबत साजरी करत त्यांचे कष्ट वाटून घेण्याचा मनोदय राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केला आहेत.

ना. पंकजाताई मुंडे यांनी समाज माध्यमावर एक व्हिडिओ शेअर केला आहे. त्या म्हणाल्या, माझ्या मतदारसंघातील एका २२ वर्षीय तरुणाचा ऊसतोडणीसाठी गेलेला असताना अपघाती मृत्यू झाल्याची बातमी सकाळी सहा वाजता मिळाली आणि या घटनेने मन सुन्न झाले. त्या तरुणाच्या आयुष्यात कितीतरी स्वप्ने होती, त्याच्या कुटुंबाला त्याच्याकडून मोठ्या अपेक्षा होत्या. मात्र, एका अपघाताने सारे काही हिरावून घेतले. या घटनेने ऊसतोड कामगारांच्या कुटुंबांचे दुःख आणि त्यांच्यासमोरील संघर्ष पुन्हा एकदा प्रकर्षाने जाणवला. दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अगोदरच मन उदास आहे. त्यातच मन सुन्न करणारी ही घटना ऐन दिवाळीच्या काळात कानावर आली. तसं तर मुंडे साहेब गेल्यापासून संकटावर संकटे येतात, जातात... आता संकटांची सवय झाली असली तरी दुष्काळ आणि ऊसतोड कामगारांचा संघर्ष याने मात्र मन



अधिकच उदास बनले आहे.

मुंडे साहेब केल्यापासून खऱ्या अर्थाने दिवाळी सण उत्सव स्वरूपात आपण कधी केलाच नाही दरवर्षी अनाथ मुलांसोबत आपण दिवाळी साजरी करतो. प्रत्येकाच्या वाट्याला वैभव आणि ऐश्वर्य येतेच असे नाही. मात्र, प्रत्येकालाच सुखाने जगण्याचा अधिकार आहे. माझा जन्म मुंडे साहेबांच्या पोटी झाला, हे माझे भाग्य आहे. पुन्हा जन्माची निवड करण्याची संधी मिळाली तरी मी त्यांच्याच पोटी जन्म घेण्याची इच्छा व्यक्त करेन; पण आजूबाजूला असणाऱ्या कष्टकरी कुटुंबांचे दुःख पाहून मनाला चैन पडत नाही, असे त्या म्हणाल्या.

भाऊबीज ऊसतोड कामगारांसोबत ; कष्ट वाटून घेऊ

यंदाच्या दुष्काळी परिस्थितीत अनेक कुटुंब आर्थिक संकटाचा सामना करत आहेत. ऊसतोड कामगारांचे जगणे तर अधिकच संघर्षमय झाले आहे. त्यांच्या कुटुंबातील मुलांच्या वाट्याला आनंदाचे क्षण यावेत, त्यांच्यासोबत आपुलकीचे नाते अधिक घट्ट व्हावे, या भावनेतून यंदाची भाऊबीज ऊसतोड कामगार व शेतकऱ्यांसोबत साजरी करण्याची इच्छा निर्माण झाल्याचे पंकजाताईंनी सांगितले.

शेतकरीही संकटात; कष्टकऱ्यांच्या वेदनांची जाणीव

केवळ ऊसतोड कामगारच नव्हे, तर ऊस उत्पादक शेतकरीही आज संकटात आहे. दुष्काळी परिस्थितीमुळे शेती आणि शेतकऱ्यांसमोर अनेक प्रश्न उभे आहेत. अशा वेळी समाजातील वंचित, कष्टकरी आणि संकटग्रस्त घटकांच्या पाठीशी उभे राहणे ही आपली जबाबदारी आहे, अशी भावनाही त्यांनी व्यक्त केली.

थंडीपासून बचाव नाही, तर मायेची ऊब... युवाक्रांतीचा हात आजी–आजोबांच्या हातात!

घाटसावळी वृद्धाश्रमात ब्लँकेट वाटप, अनेक डोळे पाणावले

बीड । प्रतिनिधी

ज्यांनी आयुष्यभर दुसऱ्यांसाठी कष्ट केले, तीच माणसं आज वृद्धाश्रमात एकाकी जगत आहेत. त्यांच्या थंडीत कुडकुडणाऱ्या शरीराला फक्त ब्लँकेट नको होतं, तर कुणीतरी प्रेमाने जवळ यावं, हात हातात घ्यावा, आम्ही आहोत असं म्हणावं, एवढीच अपेक्षा होती. तीच माया घेऊन बीडची युवाक्रांती सेवाभावी संस्था घाटसावळीला पोहोचली.

श्री विठ्ठल रुक्मिणी सेवाभावी संस्था संचलित लोकनेते गोपीनाथराव मुंडे वृद्धाश्रम, घाटसावळी येथे युवाक्रांती सेवाभावी संस्थेच्या वतीने निराधार आजी–आजोबांना ब्लँकेट वाटप करण्यात आले. ब्लँकेट हातात देताना आजी–आजोबांच्या चेहऱ्यावर हसू होतं, पण डोळ्यात मात्र कृतज्ञतेचं पाणी होतं. पोरांनो, तुम्ही आलात, हेच खूप आहे, असं म्हणत अनेकांनी आशीर्वाद दिले.

संस्थेचे अध्यक्ष सुहास पाटील यांच्या पुढाकारातून हा उपक्रम झाला. कार्यक्रमाच्या



अध्यक्षस्थानी श्री विठ्ठल रुक्मिणी सेवाभावी संस्थेचे प्रमुख तथा बीड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष शिवाजीराव फड होते, तर विशेष अतिथी म्हणून कैलास शेजाळ उपस्थित होते. यावेळी संस्थेच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना अध्यक्ष सुहास पाटील म्हणाले, हा उपक्रम आम्ही फक्त सामाजिक बांधिलकी म्हणून करत नाही. ही आपली माणसं आहेत. समाजासाठी आपण काहीतरी देणे लागतो, या भावनेतून आम्ही इथे आलो आहोत. एक ब्लँकेट कदाचित छोटी गोष्ट वाटेल, पण त्या मागची माया खूप मोठी आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजिनाथ शेरकर यांनी केले, तर अध्यक्षीय समारोप शिवाजीराव फड यांनी केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अमोल नेहरकर, वर्षा शेरकर, योगेश कुलकर्णी, गोरख फड, गीताराम गायकवाड, सहदेव फड यांनी परिश्रम घेतले.शेवटी सामूहिक पसायदानाने वातावरण आणखीनच भारावून गेलं. जाताना प्रत्येक आजी–आजोबा हेच म्हणत होते, परत नक्की या.

धारुर येथील सर्वे नंबर १२४, २६६, ९३/अ मधिल जमिनीचे खरेदी विक्री व्यावहारास प्रतिबंध

पाटोदा । प्रतिनिधी

मौजे धारूर येथील वादग्रस्त जमिनीबाबत धारूर न्यायालयाने एक महत्त्वपूर्ण आणि मोठा निर्णय दिला आहे. येथील सर्वे नंबर १२४, २६६ आणि ९३/अ मिधील जमिनीची कोणत्याही प्रकारची विक्री, गहाणखत किंवा हस्तांतरण करण्यास न्यायालयाने तात्पुरती मनाई (तुर्तातुर्त मनाई हुकूम) जाहीर केली आहे. पाटोदा येथील रहिवासी सारिका मोहित पढीयार यांनी दाखल केलेल्या वाटपाच्या दिवाणी दाव्यात धारूर न्यायालयाने हा आदेश दिला असल्याची माहिती वादीचे वकील डव्होकेट जे. बी. बडे यांनी दिली आहे.

धारुर न्यायालयाचा महत्वपुर्ण निकाल

याबाबत अधिक माहिती अशी पाटोदा येथील सारिका मोहित पढीयार यांनी धारूर तालुका न्यायालयात प्रतिवादी मालतीबाई अर्जुन प्रसाद तिवारी, अनिल अर्जुन प्रसाद तिवारी, संतोष कुमार अर्जुन प्रसाद तिवारी, अरुणा अनिल पांडे, दर्शनकुमार घनश्याम तोष्णीवाल. आणि माधव अंबादास निर्मळ यांच्या विरोधात मौजे धारूर येथील जमीन सर्वे नंबर १२४, २६६, ३७४ आणि ९३/अ बाबत वाटपाचा दिवाणी दावा क्रमांक ८२/२०२६ (ठशस. ७८५/२०२६) दाखल केलेला आहे.

हा मुख्य दावा न्यायालयात प्रलंबित असेपर्यंत प्रतिवादींनी सदरील जमिनीची विल्हेवाट लावू नये, यासाठी वादी सारिका पढीयार यांच्या वतीने न्यायालयात जमिनीच्या विक्रीस 'तुर्तातुर्त मनाई हुकूम' मिळावा म्हणून स्वतंत्र अर्ज दाखल करण्यात आला होता.

या मनाई अर्जावर दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर धारूर न्यायालयाने दिनांक ३ नोव्हेंबर २०२६ रोजी वादी सारिका मोहित पढीयार यांचा अर्ज मंजूर केला. न्यायालयाने आपल्या आदेशात स्पष्ट केले आहे की, नमूद जमिनींपैकी सर्वे नंबर ३७४ व्यतिरिक्त इतर सर्व जमिनी म्हणजेच सर्वे नंबर १२४, २६६ आणि ९३/अ मधील जमीन कोणासही गहाणखत, दान, तारण, विक्री अथवा अन्य कोणत्याही मार्गाने हस्तांतरित करू नये. न्यायालयाने या जमिनीच्या व्यवहाराला तूर्त स्थगिती दिली आहे.

या आदेशाबाबत माहिती देताना वादीचे वकील डव्होकेट जे. बी. बडे यांनी स्पष्ट केले आहे की, धारूर न्यायालयाच्या या आदेशामुळे मौजे धारूर येथील सर्वे नंबर १२४, २६६ आणि ९३ मधील जमिनीबाबत आता कोणालाही कसलाही खरेदी–विक्रीचा व्यवहार करता येणार नाही.

टकले कुटुंबीयांना २५ लाखांची आर्थिक मदत; आ. सुरेश धस यांच्या हस्ते धनादेश सुपूर्द

वाघाच्या हल्ल्यात देविदास टकले यांच्या मृत्यूनंतर कुटुंबीयांना आ.सुरेश धस यांच्या प्रयत्नाने मदतीचा आधार

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील देवळाली–लोखंडवाडी येथील देविदास माणिक टकले यांचा वाघाच्या हल्ल्यात शनिवारी दुर्दैवी मृत्यू झाल्याने टकले कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या दुःखद प्रसंगी आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी टकले कुटुंबीयांची रविवारी भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. तसेच शासनाच्या वतीने मंजूर करण्यात आलेली एकूण २५ लाख रुपयांची आर्थिक मदत त्यांच्या कुटुंबीयांकडे सुपूर्द केली.

देविदास टकले यांच्या पत्नी नंदाबाई टकले तसेच मुले कृष्णा आणि नितीन यांच्याकडे आमदार



सुरेश धस यांच्या हस्ते १० लाख रुपयांचा धनादेश आणि १५ लाख रुपयांची मुदत ठेव (एफडी), अशी एकूण २५ लाख रुपयांची मदत सुपूर्द करण्यात आली. कुटुंबाचा आधार असलेली व्यक्ती अचानक हिरावली जाणे, ही अत्यंत वेदनादायी घटना असून या दुःखातून सावरण्यासाठी कुटुंबीयांना धीर देत आमदार धस यांनी त्यांच्याशी संवाद साधला.

यावेळी विभागीय वन अधिकारी अमोल गरगळ, आष्टी वनपरिक्षेत्र अधिकारी अमोल मुंडे, माजी जि.प.सदस्य रावसाहेब शिरसाठ,उपसभापती रमेश तांदळे, श्याम तळेकर, सरपंच प्रल्हाद मुळीक, सरपंच मोहन आमटे, माजी सरपंच बंडू तळेकर, सरपंच पोपट शेकडे, सदाशिव घुमरे, रमेश डोके यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. आर्थिक मदतीमुळे कुटुंबीयांचे झालेले नुकसान भरून निघणार नाही. मात्र, या कठीण प्रसंगी कुटुंबाला आर्थिक आधार मिळावा आणि त्यांना पुढील आयुष्यात काहीसा दिलासा मिळावा, या प्रामाणिक भावनेतून शासनाच्या माध्यमातून ही मदत देण्यात आली असल्याची भावना आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केली.

देवळाली–लोखंडवाडी परिसरात घडलेल्या या घटनेमुळे नागरिकांच्या जीविताच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. केवळ आर्थिक मदत देऊन हा प्रश्न संपणार नाही, तर भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी वनविभागाने प्रभावी पावले उचलणे गरजेचे आहे. परिसरातील वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करण्यासह नागरिकांच्या जीविताचे संरक्षण करण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशा स्पष्ट सूचना आमदार सुरेश धस यांनी संबंधित वनविभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या.



रुई (पिंपळा) येथे माणुसकीचा महाउत्सव : १२० गरजू कुटुंबांना मदतीचा हात, दिव्यांगांना धनादेश, महिलांना साडी–चोळी वाटप

वडवणी । प्रतिनिधी

दिवाळीचा सण म्हणजे आनंद, उत्साह आणि आपुलकीचा सण! मात्र आर्थिक परिस्थितीमुळे अनेक गरीब, गरजू आणि निराधार कुटुंबांना सणाचा आनंद मनमोकळेपणाने साजरा करता येत नाही. अशा कुटुंबांच्या चेहऱ्यावर दिवाळीचा आनंद फुलविण्यासाठी रुई (पिंपळा) येथील सरपंच मयूर आंधळे यांनी सामाजिक बांधिलकी जपत स्तुत्य उपक्रम राबविला. स्व. यादवराव बापू आंधळे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित या उपक्रमांतर्गत गावातील जवळपास १२० गरजू कुटुंबांना किराणा साहित्य किटचे वाटप करण्यात आले. तर तब्बल १२०० नागरिकांसाठी स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली. या उपक्रमातून समाजातील वंचित आणि गरजू घटकांसोचत दिवाळीचा आनंद वाटून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला.

या उपक्रमांतर्गत ग्रामपंचायत कार्यालय, रुई (पिंपळा) यांच्या वतीने गावातील १५ दिव्यांग व अपंग व्यक्तींना प्रत्येकी १ हजार ५०० रुपयांचे धनादेश वितरित करण्यात आले. त्याचबरोबर स्व. यादवराव बापू आंधळे यांच्याकडून या लाभार्थ्यांना किराणा साहित्य किटचेही वाटप करण्यात आले.



सरपंच मयूर आंधळेंची गोरगरीबांना दिवाळी भेट! १२० कुटुंबांना किराणा साहित्य किटचे वाटप; १२०० नागरिकांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन

दिव्यांग व्यक्तींना आर्थिक मदतीचा आधार मिळावा आणि त्यांचीही दिवाळी आनंदात साजरी व्हावी, हा या उपक्रमामागील उद्देश होता

विधवा, वृद्ध आणि निराधार महिलांना साडी–चोळी व किराणा साहित्य

स्व. यादवराव बापू आंधळे सोशल फाउंडेशन, वडवणी यांच्या वतीने गावातील ६० विधवा, वृद्ध आणि निराधार महिलांना सन्मानपूर्वक साडी–चोळी, नाटी तसेच किराणा साहित्य किटचे वाटप करण्यात आले. सणासुदीच्या काळात आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या महिलांना मदतीचा हात देत त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला. तसेच गावातील जवळपास ४५ आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबे आणि भूमिहीन शेतमजूर कुटुंबांनाही किराणा साहित्य किट देण्यात आले. अशा प्रकारे गावातील दिव्यांग, विधवा, वृद्ध, निराधार महिला, आर्थिक दुर्बल आणि भूमिहीन कुटुंबांना या उपक्रमाचा लाभ मिळाला. बाटप करण्यात आलेल्या किराणा साहित्य किटमध्ये उत्तम दर्जाच्या जीवनावश्यक वस्तूंचा समावेश होता. एका कुटुंबाला जवळपास महिनाभर पुरेल एवढे शिधासाहित्य देण्यात आल्याने गरजू कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला.

१२०० नागरिकांसाठी स्नेहभोजन; गावकऱ्यांसह मान्यवरांची उपस्थिती

केवळ साहित्य वाटपापुरता उपक्रम मर्यादित न ठेवता सामाजिक एकोपा आणि बंधुभाव वृद्धिंगत व्हावा, या भावनेतून तब्बल एकत्रितपणे स्नेहभोजनाचा आनंद घेत सामाजिक सलोख्याचा संदेश दिला. सामाजिक बांधिलकीतून दिवाळीचा आनंद द्विगुणित १२०० नागरिकांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. या स्नेहभोजनाला गावातील सर्व नागरिक, महिला, तरुण मंडळींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाला वडवणीचे तहसीलदार, नायब तहसीलदार, माजलगाव येथील पोलीस अधिकारी, बीड जिल्हा परिषद कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, महसूल विभागाचे मंडळ अधिकारी, आरोग्य, शिक्षण व कृषी विभागातील अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. याशिवाय विविध पदाधिकारी, परिसरातील गावांचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी, वडवणी पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी, तालुक्यातील पत्रकार बांधव, प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आणि मित्रमंडळींनीही उपस्थिती लावली. सर्वांनी सण–उत्सव केवळ स्वतःपुरते मर्यादित न ठेवता समाजातील गरजू घटकांपर्यंत आनंद पोहोचविणे, हीच खरी सामाजिक बांधिलकी असल्याचे या उपक्रमातून अधोरेखित झाले. दिव्यांग व्यक्तींना आर्थिक मदत, निराधार महिलांना सन्मानाची भेट, भूमिहीन शेतमजूर आणि गरीब कुटुंबांना महिनाभर पुरेल एवढे किराणा साहित्य, तसेच गावकऱ्यांसाठी स्नेहभोजन अशा विविध उपक्रमांमुळे रुई (पिंपळा) गावात सामाजिक एकोप्याचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाला उपस्थित राहन उपक्रमाला सहकार्य करणाऱ्या सर्व अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, ग्रामस्थ आणि मित्रमंडळींचे सरपंच मयूर आंधळे यांनी मनःपूर्वक आभार व्यक्त केले. स्व. यादवराव बापू आंधळे यांच्या स्मृती जपत त्यांच्या नावाने सामाजिक उपक्रम राबविण्यात आल्याने या दिवाळी भेटीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. अमोल राठोड यांनी केले.



दुष्काळ, कर्जमाफीसाठी रविकांत तुपकरांचा सरकारविरोधात एल्गार!

१४ नोव्हेंबरपासून दुष्काळ संघर्ष यात्रा; ४ डिसेंबरला बुलडाण्यात एल्गार महामोर्चा

बुलडाणा

दुष्काळ, शेतीमालाचे घसरलेले दर, सरसकट कर्जमाफी आणि खासगी फायनान्स कंपन्यांच्या सक्तीच्या वसुलीविरोधात शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी सरकारविरोधात संघर्षाची घोषणा केली आहे. क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने १४ नोव्हेंबरपासून जिल्ह्यात 'दुष्काळ संघर्ष यात्रा' काढण्यात येणार असून, ४ डिसेंबरला बुलडाणा येथे एल्गार महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. ७ डिसेंबरपासून नागपुरात सुरू होणाऱ्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनापूर्वी शेतकऱ्यांचे प्रश्न सरकारसमोर तीव्रतेने मांडण्याची रणनीती संघटनेने आखली आहे.

कापसावरील शून्य टक्के आयात शुल्काच्या निर्णयाविरोधात शासन निर्णयाची (जीआर) होळी केल्यानंतर बुलडाणा शहरातील संगम चौकात आंदोलन करण्यात आले. केंद्र सरकारच्या या निर्णयाचा निषेध करत कापसावरील आयात शुल्क ३० टक्क्यांपर्यंत वाढवावे, सोयापेंड आयात करू नये आणि शेतमालाला योग्य भाव द्यावा, अशा मागण्या करण्यात आल्या. यानंतर स्थानिक विश्रामगृहात झालेल्या बैठकीत आगामी आंदोलनाची दिशा निश्चित करण्यात आली. या वेळी रविकांत तुपकर यांनी सरकारला आक्रमक इशारा दिला. शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य न झाल्यास मंत्र्यांच्या कॉलर पकडून त्यांना रस्त्यावर आणल्याशिवाय शेतकरी स्वस्थ बसणार नाहीत, असा संतप्त इशारा त्यांनी दिला. १४ नोव्हेंबरला मलकापूर येथून दुष्काळ संघर्ष यात्रेला सुरुवात होणार आहे. नांदुरा, जळगाव जामोद, संग्रामपूर, शेगाव, खामगाव, मेहकर, लोणार, सिंदखेड



राजा, देऊळगाव राजा आणि चिखली या तालुक्यांतून ही यात्रा मार्गक्रमण करणार आहे. गावागावांत मुक्काम, जाहीर सभा, पथनाट्य आणि जनजागृतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला जाणार आहे. ४ डिसेंबरला बुलडाणा शहरात एल्गार महामोर्चाने यात्रेचा समारोप होईल. बैठकीत दुष्काळी परिस्थिती, शेतीमालाचे घसरलेले दर, कर्जमाफी आणि शेतकऱ्यांच्या विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली. क्षेत्राची मर्यादा न घालता शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये नुकसानभरपाई द्यावी, सरसकट कर्जमाफी करावी आणि यापूर्वीच्या तिन्ही कर्जमाफी योजनांचा लाभ न मिळालेल्या शेतकऱ्यांनाही कर्जमुक्त करावे, अशी मागणी संघटनेने केली आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांचे प्रोत्साहन अनुदान द्यावे, तसेच शेतमजूर आणि भूमिहीन कुटुंबांसाठी स्वतंत्र आर्थिक पॅकेज जाहीर करावे, अशीही मागणी करण्यात आली. याशिवाय, ओटीएस (एकरकमी कर्ज परतफेड) योजनेमुळे शेतकऱ्यांच्या सिबिल गुणांकनावर होणारा विपरीत परिणाम टाळण्यासाठी राज्य सरकारने रिझर्व्ह बँकेशी चर्चा करावी, अशी भूमिका संघटनेने मांडली. संकटग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी क्रांतिकारी हेल्पलाईन सेंटर अधिक सक्रिय करण्याचाही निर्णय बैठकीत घेण्यात आला. आता संघर्ष यात्रेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे प्रश्न किती व्यापक स्वरूपात पुढे येतात आणि सरकार त्यावर काय भूमिका घेते, याकडे लक्ष लागले आहे.

द्राक्ष लागवड: नफा मिळवून देणारा फळबागायत व्यवसाय

द्राक्ष लागवड हा महाराष्ट्रातील एक अत्यंत महत्त्वाचा आणि नफा मिळवून देणारा फळबागायत व्यवसाय आहे. यशस्वी द्राक्ष लागवडीसाठी हवामान, माती, वाण निवड आणि योग्य व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे असते. द्राक्ष लागवडीची संपूर्ण माहिती जाणून घ्या हवामान: द्राक्ष पिकासाठी कोरडे आणि उष्ण हवामान उत्तम असते. फळधारणेच्या आणि पिकण्याच्या काळात कडक ऊन आणि कोरडे हवामान आवश्यक असते. अति पाऊस किंवा जास्त दमट हवामानामुळे रोगांचा प्रादुर्भाव वाढतो.माती: चांगला निचरा होणारी, मध्यम ते खोल (६० ते ९० सेंमी) आणि जमिनीचा सामू (कि) ६.५ ते ७.५ असणारी जमीन योग्य मानली जाते. क्षारयुक्त किंवा चोपण जमिनीत लागवड टाळावी. प्रमुख आणि लोकप्रिय वाण टेबल ग्रेप्स (खाण्यासाठी): थॉमसन सीडलेस, माणिक चमन, तास-ए-गणेश, शरद सीडलेस (काळा), २०६-२ (कृष्णा शेडलेस), फ्लेम सीडलेस (तांबडा). वायनासाठी : शिराझ, कॅबरने सोव्हिन्यॉन, चेनिन ब्लँक. मनुका बनवण्यासाठी: थॉमसन सीडलेस आणि त्याचे उपवाण. प्लॉटची तयारी: जमिनीची खोल नांगरट करून ढेकळे फोडावीत. जमीन सपाट करून घ्यावी.खड्ड्यांचा आकार: १ ह्न १ ह्न १ मीटर किंवा ३ ह्न ३ फुटांचे खड्डे किंवा ट्रेंच (चर) तयार करावेत.लागवडीचे अंतर:सर्वसाधारण अंतर: ९ ह्न ५ फूट किंवा १० ह्न ६ फूट.खड्डे भरणे: प्रति खड्डा १५-२० किलो चांगले कुजलेले शेणखत, १ किलो सिंगल सुपर फॉस्फेट आणि ५० ग्रॅम ट्रायकोडर्मा मिसळून खड्डे भरावेत.

मराठवाड्यात रब्बी पेरणीचा वेग मंदावला; तीन जिल्ह्यांत केवळ १३ टक्के क्षेत्रावर पेरणी!

बीड जिल्ह्यात तुलनेने समाधानकारक स्थिती; छत्रपती संभाजीनगरमध्ये अवघ्या ५ टक्के, तर जालन्यात ४.४७ टक्के पेरणी

संभाजीनगर

मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड या तीन जिल्ह्यांत रब्बी हंगामातील पेरणीचा वेग अत्यंत मंदावल्याचे चित्र समोर आले आहे. या तीन जिल्ह्यांचे रब्बी पिकांचे सर्वसाधारण क्षेत्र ७ लाख २७ हजार ५७४ हेक्टर असताना आतापर्यंत केवळ ९५ हजार ८१२ हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. म्हणजेच सर्वसाधारण क्षेत्राच्या तुलनेत अवघ्या १३.१७ टक्के क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली आहे. त्यामुळे रब्बी हंगामाच्या सुरुवातीलाच पेरणीची गती संथ असल्याचे स्पष्ट होत आहे.

तीन जिल्ह्यांच्या पेरणी क्षेत्राचा विचार करता बीड जिल्ह्याची स्थिती तुलनेने समाधानकारक दिसत असली, तरी छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यांत पेरणीचा टक्का अत्यल्प आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात रब्बीचे सर्वसाधारण क्षेत्र २ लाख ३८ हजार ८२१ हेक्टर आहे. मात्र, प्रत्यक्षात केवळ ११ हजार ९५२ हेक्टरवर पेरणी झाली असून, हे प्रमाण अवघे पाच टक्के आहे. जालना जिल्ह्यातही परिस्थिती फारशी वेगळी नाही. या जिल्ह्याचे रब्बीचे सर्वसाधारण क्षेत्र २ लाख ११ हजार ८१९ हेक्टर असताना आतापर्यंत केवळ ९ हजार ४७२ हेक्टरवर पेरणी झाली आहे. सर्वसाधारण क्षेत्राच्या तुलनेत हे प्रमाण केवळ ४.४७ टक्के आहे.दुसरीकडे, बीड जिल्ह्यात रब्बी पेरणीने तुलनेने चांगली आघाडी घेतली आहे. जिल्ह्याचे सर्वसाधारण रब्बी क्षेत्र २ लाख ७६ हजार ९३३ हेक्टर असून, आतापर्यंत ७४ हजार ९६ हेक्टरवर पेरणी झाली आहे. हे प्रमाण २६.७६ टक्के आहे. जिल्ह्यात रब्बी ज्वारीला शेतकऱ्यांची अधिक पसंती असल्याचे पेरणीच्या आकडेवारीवरून दिसून येते. ज्वारीचे सरासरी क्षेत्र १ लाख २८ हजार १०८ हेक्टर असताना प्रत्यक्षात ४९ हजार ८८२ हेक्टरवर पेरणी झाली आहे. त्यामुळे एकूण रब्बी पेरणीत ज्वारीचा मोठा वाटा आहे. हरभऱ्याचे सर्वसाधारण क्षेत्र १ लाख ६ हजार २३९ हेक्टर असताना आतापर्यंत सुमारे २१ हजार ९०४ हेक्टरवर पेरणी झाली आहे. म्हणजेच हरभऱ्याची पेरणी सरासरी क्षेत्राच्या तुलनेत जवळपास २० टक्क्यांवर पोहोचली आहे. गव्हाच्या पेरणीची स्थिती मात्र अत्यंत संथ आहे. जिल्ह्यात गव्हाचे सर्वसाधारण क्षेत्र ३१ हजार १०२ हेक्टर असून, प्रत्यक्षात केवळ १ हजार ८३ हेक्टरवर पेरणी झाली आहे. हे प्रमाण अवघे ३.४८ टक्के आहे. रब्बी मक्याचे सर्वसाधारण क्षेत्र ३ हजार ६३३ हेक्टर असताना ७८१ हेक्टरवर लागवड झाली असून, हे प्रमाण सुमारे २१ टक्के आहे. एकंदरीत, तीन जिल्ह्यांतील रब्बी पेरणीचे चित्र पाहता बीड जिल्ह्याने तुलनेने आघाडी घेतली असली, तरी छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यांतील अत्यल्प पेरणी चिंतेचा विषय ठरत आहे. आगामी काळात पेरणीचा वेग कितपत वाढतो आणि सर्वसाधारण क्षेत्राच्या तुलनेत किती क्षेत्र रब्बी पिकांखाली येते, याकडे शेतकरी आणि कृषी विभागाचे लक्ष लागले आहे.

कष्टकरी व ऊसतोड कामगारांचे नेते स्व.बबनराव ढाकणे ते प्रतापकाका पासून ऋषिकेश पर्यंत राजकीय आलेख

माजी केंद्रीय मंत्री आणि महाराष्ट्राच्या राजकारणातील एक आक्रमक व जनमानसातील संघर्षशील नेते स्व.बबनराव ढाकणे (१० नवंबर १९३७ - २६ ऑक्टोबर २०२३) हे शून्यातून स्वतःचे कर्तृत्व सिद्ध करणारे एक अद्वितीय व्यक्तिमत्त्व होते सामान्य शेतकरी कष्टकरी आणि प्रामुख्याने ऊसतोड मजुरांच्या हक्कांसाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला स्व.बबनराव ढाकणे यांचा जन्म अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील अकोला या गावी झाला केवळ नववीपर्यंत शिक्षण झालेल्या बबनराव यांनी अत्यंत तरुण वयातच समाजकारणात स्वतःला झोकून दिले होते .







विद्यार्थी दशेत असतानाच १९५१ मध्ये थेट दिल्लीला जाऊन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची भेट घेणे हे त्यांच्या आयुष्यातील पहिले आंदोलन ठरले त्यानंतर त्यांनी गोवा मुक्ती संग्रामातही सक्रिय सहभाग घेतला आणि कारावास भोगला स्व.बबनराव ढाकणे यांच्यातील आक्रमक आणि जनहितैषी नेता महाराष्ट्राने १९६७ मध्ये पाहिला पाथर्डी तालुक्यातील वीज आणि दुष्काळाच्या प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी त्यांनी थेट विधानसभेच्या प्रेक्षक गॅलरीतून पत्रके भिरकावली आणि खाली उडी मारण्याचा प्रयत्न केला या घटनेमुळे त्यांच्यावर हक्कभंगाची कारवाई होऊन सात दिवसांची शिक्षा झाली मात्र त्यांनी जनतेच्या प्रश्नासाठी माफी मागण्यास साफ नकार दिला त्यांच्या या आक्रमक पवित्र्यामुळे तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी स्वतः बैठक घेऊन पाथर्डीचे प्रश्न सोडवण्याचे आश्वासन दिले स्व.बबनराव ढाकणे यांनी ग्रामपंचायत बाजार समिती जिल्हा परिषद सदस्य ते थेट देशाचे केंद्रीय मंत्री असा थक्क करणारा प्रवास केला स्व.बबनराव ढाकणे हे चार वेळा विधानसभेवर निवडून गेले त्यांनी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री आणि ग्रामविकास मंत्री म्हणून धडाडीने काम केले याशिवाय त्यांनी महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेतेपद आणि उपाध्यक्षपदही भूषवले १९८९ मध्ये ते बीड लोकसभा मतदारसंघातून जनता दलाच्या तिकिटावर खासदार म्हणून निवडून गेले आणि पंतप्रधान चंद्रशेखर यांच्या मंत्रिमंडळात केंद्रीय ऊर्जा संसाधन राज्यमंत्री बनले ऊसतोड मजूर आणि वंचितांचे कैवारी स्व.बबनराव ढाकणे यांची खरी ओळख ऊसतोड मजुरांचे नेते म्हणून कायम राहिली त्यांनी नागनाथ आण्णा नाईकवाडी यांच्या सोबतीने राज्यातील ऊसतोड कामगारांचे संघटन बांधले आणि त्यांच्या मजुरीचे करार साखर संघाकडून मंजूर करून घेतले ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी त्यांनी एकलव्य शिक्षण संस्थेची स्थापना करून शिक्षणाची दारे खुली केली तसेच शेवगाव-पाथर्डी भागात केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याची उभारणी करून परिसराच्या आर्थिक विकासाला गती दिली २६ ऑक्टोबर २०२३ रोजी ८६ व्या वर्षी या संघर्षयोद्ध्याचे निधन झाले काँग्रेस जनता पक्ष जनता दल आणि राष्ट्रवादी काँग्रेस अशा विविध पक्षांमध्ये काम करताना त्यांनी नेहमीच स्वतःची वेगळी ओळख आणि तत्त्वे जपली सर्वसामान्यांच्या हक्कांसाठी लढणारा प्रस्थापितांना आव्हान देणारा आणि उपेक्षितांना न्याय मिळवून देणारा एक प्रामाणिक लोकनेता म्हणून स्व.बबनराव ढाकणे यांचे नाव महाराष्ट्राच्या इतिहासात नेहमीच आदराने घेतले जाईल स्व.बबनराव ढाकणे यांचे राजकीय वारसदार ॲड.प्रतापराव ढाकणे त्यांचाच राजकीय वारसा ते पुढे चालवत आहेत भाजप कालावधी: प्रताप ढाकणे यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवातीची महत्त्वाची वर्षे भारतीय जनता पक्षात घालवली ते भाजपचे अहमदनगर जिल्हाध्यक्ष म्हणून कार्यरत होते २०१४ च्या लोकसभा निवडणुकीदरम्यान भाजपचे तत्कालीन खासदार दिलीप गांधी यांच्या उमेदवारीला त्यांनी कडाडून विरोध केला पक्षांतर्गत मतभेदांमुळे त्यांनी जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा दिला आणि शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला सध्या ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरदचंद्र पवार गट) वरिष्ठ नेते आणि महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस म्हणून कार्यरत आहेत शेवगाव-पाथर्डी मतदारसंघ: प्रताप ढाकणे हे शेवगाव पाथर्डी विधानसभा मतदारसंघात अत्यंत सक्रिय आहेत त्यांनी या मतदारसंघातून निवडणूक देखील लढवली आहे स्थानिक वर्चस्व: पाथर्डी-शेवगाव परिसरातील राजळे विरुद्ध ढाकणे हा राजकीय संघर्ष सर्वश्रुत आहे पाथर्डी तालुक्यातील विविध स्थानिक निवडणुका जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या राजकारणात त्यांचा मोठा प्रभाव आहे ढाकणे कुटुंबाचे स्थानिक सहकार क्षेत्रावर मोठे नियंत्रण आहे कै.बबनराव ढाकणे यांनी स्थापन केलेल्या केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून प्रताप ढाकणे यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न हाताळले आहेत आणि या कारखान्याच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावली आहे वडिलांप्रमाणेच प्रताप ढाकणे हे देखील त्यांच्या आक्रमक वक्तृत्वासाठी आणि बुलंद आवाजासाठी ओळखले जातात दुष्काळ शेतकऱ्यांचे कर्ज ऊस उत्पादकांचे प्रश्न आणि स्थानिक पाणी प्रश्न यांवर ते सातत्याने आंदोलने आणि मोर्चे काढत असतात ज्यामुळे त्यांचा ग्रामीण भागात दांडगा जनसंपर्क आहे ढाकणे कुटुंबातील ऋषिकेश ढाकणे हे केदारेश्वर कारखान्याचे चेअरमन म्हणून सामाजिक व राजकीय जीवनात सक्रिय आहेत नुकताच त्यांचा अहिल्यानगर जिल्हा बँक निवडणुकीत पराभव झाला असला तरी अहिल्यानगर जिल्ह्यात ढाकणे कुटुंब राजकीय दृष्ट्या सक्षम पाऊल टाकत असल्याने ढाकणे कुटुंबाची तिसरी पिढी राजकीय व सामाजिक जीवनात स्व.बबनराव ढाकणे यांची राजकीय चळवळ वारसा पुढे घेऊन जात असल्याने ढाकणे यांच्या शेवगाव पाथर्डी मतदारसंघातील कार्यकर्ते उत्साहित झाल्याचे पाहायला मिळाले.

शब्दांकन व लेखक
प्रा.दादासाहेब खेडकर,
मो.७५८८०९४५४५

मुंडे धनुष्यबाणात अरुणोदय घडवणार ?

शेवगाव पाथर्डी मतदारसंघ अरुण मुंडे यांच्या रूपाने विधान परिषद मिळावी ही जनभावना

गोदावरी कृष्णा तापी नदीच्या कुशीत वाढलेल्या उत्तर महाराष्ट्रात कायम दुष्काळी परिस्थितीशी झगडत असलेल्या आणि ऊसतोड मजुरांचा पट्टा असलेल्या अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यातील पिंगेवाडी या छोट्याशा खेडेगावात शेतकरी कुटुंबात आई मीराबाई व वडील भाऊसाहेब मुंडे यांच्या पोटी जन्म घेतलेल्या अरुण भाऊसाहेब मुंडे यांचा जन्म २८ मे १९७७ रोजी झाला बालवयातच सामाजिक राजकीय आणि विद्यार्थीदशेत संकटाशी व चळवळीशी सामना करत अरुण मुंडे यांनी एम ए पदवीपर्यंतचे शिक्षण घेतले शालेय शिक्षण घेत असताना अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून तरुणांच्या विद्यार्थी चळवळीचे नेतृत्व स्वीकारले युवकांचे संघटन करण्यासाठी वंदे मातरम क्रीडा मंडळाची आणि व्यायाम शाळेची स्थापना केली कबड्डी कुस्ती सायकलिंग स्पर्धेत विशेष प्राविण्य मिळवले अरुण मुंडे यांना कबड्डी खेळाची विशेष आवड असल्याने महाराष्ट्र प्रदेश स्टेट लेवल पर्यंत कबड्डी संघाचे नेतृत्व करत नेत्रदीपक यश संपादन केले १९९० ते १९९४ या कालखंडात मराठवाड्यातील औरंगाबाद विद्यापीठाचा नामांतरणाचा तीव्र लढा सुरू असताना मराठवाड्यातील भाजपचे लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या औरंगाबाद विद्यापीठाच्या नामांतरण चळवळीतील आणि लढ्यातील आंदोलन अरुण मुंडे यांनी जवळून पाहिले आणि भारतरत्न पंतप्रधान स्व.अटल बिहारी वाजपेयी स्व.प्रमोद महाजन आणि गोपीनाथ मुंडे आणि भाजपा नेते नितीन गडकरी यांना आदर्श मानून सक्रिय सामाजिक व राजकीय जीवनात प्रवेश केला सन २००० या वर्षी अरुण मुंडे हे भाजपचे युवा मोर्चाचे तालुका अध्यक्ष झाले.

लोकहिताचे निर्णय घेणे जनतेचे शेतकरी कष्टकरी दिन दलित व्यापारी विशेषतः ऊसतोड मजूर कामगारांचे प्रश्न सोडवायचे असतील तर सार्वत्रिक निवडणुकीत उतरणे क्रमप्राप्त आहे त्याशिवाय जनतेच्या प्रश्नांना वाचा फुटणार नाही हे ओळखून अरुण मुंडे यांनी सक्रिय सार्वत्रिक निवडणुकीत उतरण्याचे ठरवले आणि सन २००४ या वर्षी त्यावेळी शेवगाव ग्रामपंचायत निवडणूक लढवली आणि अल्पशा मतांनी पराभूत झाले परंतु अरुण मुंडे यांच्यातला नेतृत्व करणारा लीडर स्वस्त बसत नव्हता संघर्ष व चळवळ हे गुण आत्मसात केलेले अरुण मुंडे संघर्षाला डगमगले नाहीत यादरम्यान अरुण मुंडे यांना भाजपच्या विविध पदांवर काम करण्याची संधी मिळाली ज्यामध्ये भाजपा पक्षाने एक चळवळीतला कार्यकर्ता आणि भाजपा पक्षाशी एकनिष्ठ असलेल्या अरुण मुंडे यांना भाजपा पक्षाचे युवा मोर्चाचे शेवगाव शहरअध्यक्ष युवा मोर्चाचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी दिली अरुण मुंडे यांनी पुन्हा जोमाने भाजपा पक्षाच्या संघटन बांधणीला व पक्षाच्या कामाला लागून युवकांचे संघटन केले तळागाळातील कष्टकरी शेतकरी जनतेचे प्रश्न सोडवण्याचे कौशल्य आत्मसात केले पुन्हा २००९ शेवगाव ग्रामपंचायतच्या सर्वत्रिक निवडणुकीत आई मीराबाई मुंडे यांना उभे करत निवडणूक जिंकले राजकारणात पाऊल ठेवल्यानंतर पंचायत राज व्यवस्थेची पहिली पायरी आपली आई मीराबाई



मुंडे यांना ग्रामपंचायत सदस्य करुन जिंकले यानंतर अरुण मुंडे यांनी कधीही मागे वळून पाहिले नाही सन २०१४ -१५ च्या शेवगाव नगरपरिषदेच्या निवडणुकीत पहिल्यांदा अरुण मुंडे भाजपचे नगरसेवक म्हणून निवडून आले सन २०१७ या वर्षी शेवगाव नगरपरिषदेवर पहिल्यांदा भाजपा पक्षाचा नगराध्यक्ष करण्यामध्ये अरुण मुंडे यांचा सिंहाचा वाटा होता यादरम्यान भाजपा पक्षाचे अहिल्यानगर जिल्हा सरचिटणीस म्हणून अरुण मुंडे यांना जबाबदारी मिळाली आणि सन २०१९ -२३ या कालावधीत भाजपा पक्षाचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष म्हणून अरुण मुंडे यांनी काम पाहिले २०१९ आणि २०२४ च्या विधानसभेच्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत अरुण मुंडे यांना पक्षाने जळगाव लोकसभा आणि उत्तर नगर विधानसभा समन्वयक निवडणूक प्रभारी केले या लोकसभा विधानसभा निवडणुकीत भाजप पक्षाने दणदणीत विजय संपादन केला भाजपा पक्षाचा व आपल्या वरिष्ठांचा आदेश सर्वोच्च मानून अरुण मुंडे यांनी पक्षाचे संघटन आणि विस्तार करण्यात कुठलीही कमतरता ठेवली नाही अरुण मुंडे यांच्या संघटन कौशल्याची चुनुक ओळखून भाजपा पक्षश्रेष्ठींनी त्यांना २०२३ या वर्षी भाजपा पक्षाचे प्रदेश सचिव केले अरुण मुंडे यांच्या राजकीय जीवनात त्यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे रवींद्र चव्हाण पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे विधान परिषदेचे सभापती राम शिंदे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील माजी खासदार डॉ.सुजय विखे पाटील यांच्याशी स्नेह आहे सन २०२४ च्या महाराष्ट्राच्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत शेवगाव पाथर्डी मतदारसंघातून अरुण मुंडे यांनी पक्षाला उमेदवारीची मागणी केली होती राजधानी दिल्ली पक्षश्रेष्ठी आणि कोअर कमिटीत अरुण मुंडे यांचे नाव निश्चित होता होता राहिले परंतु पक्षाचा आणि पक्ष नेतृत्वाचा आदेश अंतिम मानून त्यांनी शेवगाव पाथर्डी विधानसभेची निवडणूक लढवली नाही अरुण मुंडे यांनी आपल्या मागास दुर्लक्षित ऊसतोड मजुरांच्या दुष्काळी पट्टा असलेल्या शेवगाव पाथर्डीच्या तरुणांना हाताला काम मिळावे या उदात्त हेतूने सन २०२४ या वर्षी महाराष्ट्र शासन मंत्रिमंडळ निर्णय शेवगाव तालुक्यातील सोनेसांगवी येथे पिंगला सहकारी सूतगिरणीची स्थापना केली शेवगाव पाथर्डी तालुक्यातील किमान पाचशे ते सहाशे युवकांना रोजगार तेथे मिळणार आहे अशा या कार्यकुशल नेतृत्वाचा सूर्योदय आणि चळवळीतील राजकारणाचा जीवनपट अतिशय संघर्षमय राहिला आहे भाजपा पक्षाचे ब्रीदवाक्य म्हणजे आधी देश नंतर पक्ष आणि नंतर स्वतः या उक्तीप्रमाणे देशहितासाठी प्राधान्य देणारे आणि पक्षासाठी आत्मसमर्पण भावनेने काम करणारे आणि स्वतःला कधीही कुठल्याही पदाची अपेक्षा न ठेवणारे चळवळीतील नेतृत्व म्हणजे अरुण मुंडे शेवगाव तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी रस्त्यावरून उतरून आंदोलन करणारे नेतृत्व अरुण मुंडे यांच्या रूपाने शेवगाव पाथर्डी मतदारसंघातील जनतेने पहिले आहे परंतु शेवगाव पाथर्डी मतदारसंघात अरुण मुंडे यांच्यासारख्या सर्वसामान्य विस्थापित कार्यकर्त्याचा राजकारणात वारू वाढत असल्याने शेवटी प्रस्थापित राजकीय प्रतिस्पर्ध्यांनी अरुण मुंडे यांच्या राजकीय महत्त्वकांक्षेला भाजपा पक्षश्रेष्ठींशी राजकीय वाटाघाटी करून सूर्यास्त केला शेवटी कमळाच्या पाकळ्यातून राजकारणाचा उदय झालेले अरुण मुंडे अखेरीस भाजप पक्षात त्यांची राजकीय कोंडी करत शेवगाव नगरपालिकेच्या निवडणुकीत त्यांना स्थानिक लोकप्रतिनिधीच्या माध्यमातून नगराध्यक्ष पदासाठी भाजप पक्षाची उमेदवारी कापण्यात आली आणि अखेर अरुण मुंडे यांनी आयुष्यभर चळवळ केलेला भाजप पक्ष सोडल्यात निष्पन्न झाले २०२५-२६ च्या शेवगाव नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत अरुण मुंडे यांच्या मागे शेवगावकरांचे जनमत असल्याने त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात प्रवेश करत थेट धनुष्यबाण हाती घेऊन ऐन निवडणुकीच्या अल्प कालावधीत शेवगाव नगरपरिषदेत त्यांच्या सौभाग्यवती माया अरुण मुंडे या थेट जनतेतून नगराध्यक्ष म्हणून निवडून आल्या आणि शेवगाव नगरपरिषदेवर शिवसेनेचा भगवा फडकवला अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत निवडणूक लढवून शिवसेनेचा जनाधार नसताना शिवसेनेचा नगराध्यक्ष व चार शिवसेनेचे नगरसेवक शेवगाव नगरपरिषदेवर निवडून आणण्यात अरुण मुंडे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली अरुण मुंडे यांच्या राजकीय सूर्योदयास पालवी बहरण्याची वेळ आली आहे यामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्वसामान्य कुटुंबातील कार्यकर्ता अशी ओळख असलेल्या व शेवगाव पाथर्डी मतदारसंघातील जनतेच्या कायम सुखदुःखात सहभागी असलेल्या अरुण मुंडे यांना विधान परिषदेवर आमदार करून नक्कीच न्याय देतील अशी अपेक्षा आहे.

शब्दांकन व लेखक
प्रा.दादासाहेब खेडकर,
मो.७५८८०९४५४५

शेतकऱ्यांच्या वेदना जाणून घेण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सोमवारी जालन्यात

जालना। प्रतिनिधी

दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी, शेतमजूर, छोटे व्यापारी, व्यावसायिक आणि सर्वसामान्य नागरिक विविध अडचणींचा सामना करीत असताना, त्यांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेण्यासाठी आणि शेतकरी कुटुंबांसोबत दिवाळी साजरी करण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे सोमवार, दि. ९ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी २ वाजता जालना विधानसभा मतदारसंघाच्या दौऱ्यावर येत आहेत.जालना तालुक्यातील मौजपुरी येथील श्री रामेश्वरी महादेव संस्थान येथे उपमुख्यमंत्री शिंदे हे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांशी थेट संवाद साधणार असून, त्यांच्या अडचणी, शेतीचे नुकसान, पाणीटंचाई, पशुधनासाठी चाऱ्याची समस्या, रोजगाराचा प्रश्न आणि आर्थिक संकट यांसह विविध



समस्या जाणून घेणार आहेत. त्यानंतर परिसरातील शेतकरी कुटुंबांसोबत दीपावली साजरी करून त्यांच्या सुखदुःखात सहभागी होणार आहेत.दिवाळी हा आनंदाचा आणि प्रकाशाचा सण असला, तरी दुष्काळाच्या संकटामुळे अनेक शेतकरी कुटुंबांसमोर उदरनिर्वाहाचे गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. शेतातील उत्पन्नावर परिणाम झाल्याने शेतमजुरांच्या रोजगारावर, तसेच ग्रामीण भागातील छोटे व्यापारी व व्यावसायिकांच्या व्यवसायावरही विपरीत परिणाम होत आहे. ज्यांना शेतीच नाही केवळ मजुरी करून अथवा छोटा मोठा व्यवसाय करून पोट भरतात अशा लोकांचे प्रश्न गंभीर बनले आहेत. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या व्यथा प्रत्यक्ष ऐकून घेणे, त्यांच्या समस्यांकडे शासनाचे लक्ष वेधणे आणि त्यांना आधार देणे, या उद्देशाने उपमुख्यमंत्री शिंदे यांचा हा दौरा आयोजित करण्यात आला आहे.

यां बैठकीस खालील मान्यवरांची उपस्थिती

या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीसंदर्भातील बैठकीस आ.हरिभाऊजी लहाने, भास्करराव अंबेकर, अभिमन्यू खोतकर, पंडितराव भुतेकर, भाऊसाहेब घुगे, ए.जे.पाटील बोराडे,ड. भास्कर मगरे, सुनील किनगावकर, सौ. दर्शनाताई झोल, कालिंदाताई ढगे, रोहिणी पिंपळे, अमोल ठाकूर, भगवान अंभोरे गणेश मोहिते, पांडुरंग डोंगरे, मुरलीआबा थेटे, वसंतराजे जाधव, बापूराव जाधव, आप्पासाहेब उगले अशोकराव डेंगळे, विठ्ठलराव पडुळ, किसन राठोड, राहुल गवारे, कमलाकर कळकुंबे, कमलेश खरे, दिनेश भगत, दुर्गेश काठोटीवाले, संजय डुकरे, हरिभाऊ शिंदे, संजय शेजुळ, कृष्णा डोंगरे, विष्णू ढोकळे, रामूकाका डोंगरे, अरुण डोंगरे, आप्पासाहेब डोंगरे, नरसिंग गोरे, नागेश डवले, बळीराम घुले, काशिनाथ जाधव, सचिन देशमुख, रमेश जाधव, अनिल राठोड, संजय वाघ, प्रभाकर घडलींग, सर्जेराव शेवाळे, बबनराव खरात, गणेश भुतेकर, अशोक ढेंगळे, गजानन शेजुळ, संजय राठोड, लक्ष्मण चव्हाण, सुधाकर ढोकळे, गोपाल डोंगरे, सिद्धार्थ मोरे, भाऊसाहेब गोरे, रमेश शिंदे,किशोर शिंदे, प्रकाश घोडे शिवाजी शेळके जफर खान संतोष सांगळे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शिवसैनिक उपस्थित होते.

'प्रायव्हेट मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन, महाराष्ट्र'चा उद्घाटन सोहळा संपन्न

जालना। प्रतिनिधी

खाजगी डॉक्टरांच्या हक्क व सुरक्षेसाठी 'PMPA महाराष्ट्र' ही अभेद्य ढाल: जालना येथे विविध वैद्यकीय संघटनांच्या उपस्थितीत ऐतिहासिक शुभारंभ. महाराष्ट्रातील खाजगी वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या डॉक्टरांच्या न्याय्य हक्कांचे रक्षण, सुरक्षा आणि आत्मसन्मानासाठी स्थापन करण्यात आलेल्या 'प्रायव्हेट मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन, महाराष्ट्र' (PMPA महाराष्ट्र) या राज्यव्यापी संघटनेचा उद्घाटन सोहळा व श्री धन्वंतरी पूजन सोहळा जालना येथे अत्यंत दिमाखदार वातावरणात पार पडला. या सोहळ्यास भारतीय स्टेट बँक (SBI) चे विशेष सहकार्य लाभले.

कार्यक्रमाच्या मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA) जालनाचे सचिव डॉ. प्रल्हाद धारूरकर, इंडियन डेंटल असोसिएशनच्या (IDA) अध्यक्षा डॉ. सुनयना पालणीतकर, सचिव डॉ. ज्ञानेश्वर सांगळे, नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशनचे (NIMA) अध्यक्ष डॉ. रवींद्र बरकुले, सचिव डॉ. योगेशसिंह कछवा, तसेच होमिओपॅथी डॉक्टर्स व स्टुडंट असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. योगेश ढेंबरे आणि सचिव डॉ. राम पाटील आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.



कष्टकऱ्यांच्या आनंदात सहभागी होणे, हीच दिवाळीची गोडी- दानवे



जालना। प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टी जालना महानगर च्या पदाधिकाऱ्यांनी (दि.०७) रोजी मौजे बठान बु. ता.जालना येथे ऊसतोड कामगारांसोबत पालावरची दिवाळी हा उपक्रम राबविण्यात आला. यानिमित्ताने परिसरातील कामगारांना दिवाळीच्या शुभेच्छा देत भेटवस्तू तसेच दैनंदिन जीवनात उपयोगी पडणाऱ्या गृहउपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी उपस्थित कामगारांशी संवाद साधला. समाजातील कष्टकरी आणि श्रमिक घटक हा आपल्या सामाजिक व्यवस्थेचा महत्त्वाचा आधार असून त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी आहे, अशी भावना यावेळी व्यक्त केली.

यावेळी भास्कर आबा दानवे म्हणाले की कष्टावर अनेकांचे जीवनमान अवलंबून आहे. दिवाळी हा आनंद, आपुलकी आणि माणुसकी जपण्याचा सण आहे. कुटुंबापासून दूर राहून कष्ट करणाऱ्या या कामगारांसोबत दिवाळीचा आनंद वाटून घेता यावा, त्यांच्याही चेहऱ्यावर आनंद फुलावा, या उद्देशाने भारतीय जनता पार्टी च्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात पालावरची दिवाळी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. समाजातील प्रत्येक घटकाच्या सुख-दुःखात व गरजूंच्या मदतीसाठी तत्पर राहणे हेच आपल्या सामाजिक बांधिलकीचे प्रतीक आहे असेही त्यांनी सांगितले.

या प्रसंगी भाजपा माजी जिल्हाध्यक्ष रामेश्वर भांदरगे, किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष सतीश केळकर, गटनेते महेश निकम, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष गोविंद भताने, सरपंच ज्ञानेश्वर देवडे, दत्तू नाना बागल, नानासाहेब देवडे, बळीराम शिंदे, जिल्हा सरचिटणीस वसंत शिंदे, सुनील पवार, शिवप्रकाश चितळकर, तालुकाध्यक्ष संजय डोंगरे, यांच्यासह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.


















cmyk

दैनिक
राज्य लोकतंत्र
सोमवार दि. ०९ नोव्हेंबर २०२६ | ६

































This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk